# प्रकरण तिसरे

# 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या ऐतिहासिक कादंबऱ्यांचे अंतरंग

# प्रकरण तिसरे

## 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या ऐतिहासिक कादंबऱ्यांचे अंतरंग

### १) आशय :-

#### १) पावनखिंड :-

'पावनखिंड' ही कादंबरी एकूण १८० पाने आणि छोटी ५८ प्रकरणे यात विभागलेली आहे. स्वराज्याचा डाव पूर्णत्वाला नेण्यासाठी अनेकांचे बलिदान कामी आले. चढे घोड्यानिशी महाराजांना पकडून नेण्यासाठी वीस हजार सैन्य, घोडे, हत्ती, उंट यांच्यासह आलेल्या धर्मांध आणि महाकपटी अफजलखानाचा प्रसंगावधान राखून राजांनी केलेला वध याचेही वर्णन आले आहे.

रणजित देसाईंची 'पावनखिंड' ही कादंबरी बाजीप्रभूंच्या समर्पणशीलतेची गाथा आपल्यासमोर ठेवते. नुसतेच बाजीप्रभूंच्या पावनखिंडीतील पराक्रमाचा जंत्रीवजा इतिहास लेखकाने आपल्यासमोर मांडला नाही तर त्या यज्ञकुंडात आपल्या प्राणाची बाजींनी आहुती दिली त्याचेही वर्णन आले आहे. बाजीप्रभूंसारखा अगोदर बांदल राजांची प्रधानकी करणारा शूर धारकरी स्वत:लाही नकळत कसा राजांच्या अधीन होतो आणि राजांच्या प्रत्येक मोहिमेत सहभागी होऊन स्वराज्य निर्मितीला हातभार लावतो आणि शेवटी लाख मेले तरी चालतील ही स्वामीनिष्ठा मनाशी बाळगून आपल्या भावासमवेत राजांच्या संरक्षणासाठी प्राणाचे बलिदान करतो. त्याची रसरशीत कहाणी म्हणजे 'पावनखिंड' होय.

**कथानक :-**

'पावनखिंड' ही कादंबरी शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा जो डाव मांडला आहे तो डाव पूर्ण करीत असताना स्वराज्यासाठी शिवाजी महाराजांसाठी आपल्या प्राणाचे बलिदान केलेल्या बाजीप्रभू देशपांडे यांच्या वीरवृत्तीची कहाणी आहे. या कादंबरीची सुरूवात बाजीप्रभूंच्या वाड्याच्या वर्णनाने होते. बाजीप्रभूंच्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्याने होते.

गावातील अनेक लोक बाजींच्याकडे आपल्या अनेक तक्रारी घेऊन येत. त्या तक्रारींचे बाजी अतिशय योग्यप्रकारे निरसन करीत.

हिरडस मावळातील सिंध गावातील बाजी आणि त्यांचे थोरले बंधू फुलाजी देशपांडे हे बांदलांचे प्रधान सेनापती. शिवाजी राजे गनिमी कावा करून रोहिडा किल्ला जिंकतात. शिवाजी - बांदल धुमश्चक्रीत बांदल कामी येतात आणि बाजी व शिवाजी आमने-सामने उभे ठाकतात. शेवटी दोघांत समझोता होतो. ''बाजी, तुम्हांला माहीत नसेल. आमच्या तलवारीचं नाव भवानी आहे. ते आमचं कुलदैवत. ती बाहेर पडते, ती फक्त अन्यायाविरूद्ध. नाही, बाजी, आमची भवानी तलवार तुमच्याकरिता नाही. बाजी, तुम्ही आम्हांला हवे आहात.''[१] राजांच्या आपल्या गोटात येण्याविषयीच्या या इच्छेवरून समझोता होऊन बाजी राजांची इच्छा मान्य करतात आणि रोहिड्यावर भगवा झेंडा फडकू लागतो. राजांच्या बोलण्याने भारावून जाऊन बाजी व फुलाजी आपली स्वामीनिष्ठा राजांच्या चरणी अर्पण करतात. येथून या कादंबरीची खरी सुरूवात होते.

बाजी रोहिडा किल्ल्याची जबाबदारी सांभाळू लागतात. मावळमधील डोंगराळ भागाचा अभ्यास बाजींनी बारकाईने केला होता. किल्ल्यांची जडणघडण हा बाजींचा आवडीचा विषय होता. हे ओळखूनच शिवाजीराजांनी जासलोड गडाच्या डागडुजीची जबाबदारी बाजींवर सोपवली. जासलोड गडाचे काम पूर्ण झाल्यानंतर बाजी आणि फुलाजी राजगडावर शिवाजीराजांच्या भेटीसाठी जातात. तेथे ते जिजाऊमातेची देखील भेट घेतात. शिवाजीराजांकडून त्यांना राजांचा बीमोड करण्यासाठी अफजलखान चालून येत असल्याची खबर कळते. शिवाजीराजे अफजलखानाशी प्रतापगडावर भेटण्याचे निश्चित करतात. लढण्याची जय्यत तयारी करून राजे प्रतापगडावर जातात आणि अफजलखानाची भेट घेतात. चढे घोड्यानिशी महाराजांना पकडून नेण्यासाठी वीस हजार सैन्य, घोडे, हत्ती, उंट यांसह आलेल्या महाकपटी अफजलखानाचा शिवाजीराजे आपल्या युक्तीने वध करतात आणि स्वराज्यावर आलेल्या महासंकटावर शिताफीने मात करतात.

त्यानंतर फाजलखान आणि रूस्तुमजमा यांचे आक्रमण शिवाजी आणि बाजी आपल्या साथीदारांच्या सहकार्याने परतवून लावतात. पण त्यानंतर थोड्याच दिवसांत एका बाजूने सिद्दी जौहर आणि दुसऱ्या बाजूने शाहिस्तेखान अफाट फौजेसह येत असल्याची खबर येते. तोपर्यंत राजे शांत न बसता अठरा दिवसांत एकवीस गड घेऊन पन्हाळ्यापर्यंत पोहोचतात.

महाराजांवर सिद्दी जौहर हल्ला करतो. पन्हाळ्याला त्याचा वेढा पडतो. या संकटाला तोंड देण्यासाठी शिवाजी आणि बाजी एक मोहिम आखतात. शिवा न्हावी राजाचे रूप घेऊन सिद्दीच्या छावणीत तहाची बोलणी करण्यासाठी दाखल होतो. त्याचवेळी राजे पालखीतून 'खेळणा' किल्ल्याकडे निघतात. इकडे शिवाचे सोंग उघडकीस येते. फाजलला कळताच तो शिवाला हरामखोर म्हणतो. त्यावर शिवा म्हणतो, "हरामखोर मी नव्हे ! मी माझ्या धन्यासाठी इथं आलो. हरामखोर तू ! बाप मेला, तरी त्याच्याकडं पाठ वळवली नाहीस. मी तसा नाही. सोंगातला का होईना, पण शिवाजी बनलो. बस्स ! जिवाचं सोनं झालं."[२] तिकडे सर्व परिस्थिती लक्षात घेऊन बाजी राजांना खेळण्याकडे जाण्यास सांगतात. परंतु राजे तयार होत नाहीत. बाजी संतापून म्हणतात, "मला सांगता ? या बाजीला ? राजे, ही सारी फौज माझी, बांदलांची आहे. प्रसंग ओढवून घेतला तर तुमच्या मुसक्या आवळून या पालखीतून तुम्हांला जावं लागेल, विंझाई शपथ सांगतो, यात तिळमात्र बदल घडणार नाही. राजे बऱ्या बोलानं गड गाठा."[३]

बाजींच्या या बोलण्याने राजे खेळण्याकडे जातात. राजे गेल्यानंतर जिवाची बाजी लावून बाजीप्रभू खिंड लढवतात. शिवाजी राजे खेळणा गडाकडे जात असताना त्यांना सुर्वे आणि मालवणकर यांनी गडाला वेढा दिलेला असतो त्यांचा सामना करावा लागतो. त्यानंतर राजे खेळणा गडावर सुरक्षित पोहोचतात. शिवाजीराजे जोपर्यंत गडावर सुरक्षित पोहोचत नाहीत तोपर्यंत बाजी अनेक जखमा होऊनदेखील खिंड लढवतात. मसूदशी झालेल्या संघर्षात त्यांच्या पाठीत गोळी शिरते. तरीही ते आपल्या मावळ्यांना प्रोत्साहन देत होते,

"लढा ! जिवाचं मोल बाळगू नका. अजून राजे ऽऽ"[४] या संघर्षात त्यांना हौतात्म्य पत्करावे लागते. आपल्या प्राणाचे बलिदान करून ते खिंड लढवतात. शेवटी बाजी-फुलाजी या बंधूंची प्रेतं एका पालखीतून गडावर आणली जातात. बाजी-फुलाजीची प्रेतं पाहून राजांचा ऊर भरून येतो. "बाजी ! काय केलंत हे ! पालखीचा मान कुठं जात होता का ? त्यासाठी हे करायला हवं होतं ? बाजी, फुलाजी .... काय केलंत हे ?"[५] राजे भावनाशील होतात. इथेच कादंबरी संपते.

'पावनखिंड' ही कादंबरी अतिशय प्रभावशाली व परिणामकारक आहे. प्राणाचे मोल न बाळगता आपल्या धन्यासाठी, स्वराज्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढणाऱ्या बाजींचे चित्रण अतिशय चित्तथरारक आहे.

**२) महारूद्र बाजीप्रभू :-**

'महारूद्र बाजीप्रभू' ही कादंबरी एकूण २८६ पाने आणि छोटी १८ प्रकरणे यामध्ये विभागलेली आहे. अरविंद दाढे यांनी या कादंबरीतून बाजीप्रभूंच्या आधीच्या तीन पिढ्यांचा इतिहास या कादंबरीद्वारे सांगितलेला आहे. त्याचप्रमाणे बाजीप्रभूंचे संपूर्ण जीवनचरित्र रेखाटलेले आहे.

चांद्रसेनीय कायस्थांचे रीती-रीवाज, रूढीपरंपरा याविषयीची माहिती मिळते. बाजीप्रभूंचे बालपण, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांचे बांदलांचे प्रधान म्हणून नेमणूक होणे, शिवाजीराजांशी भेट व त्यानंतर स्वराज्यात सामील होणे हा सर्व कथाभाग सविस्तर रीतीने आलेला आहे. देव, देश आणि धर्मासाठी 'लाख मेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा वाचला पाहिजे' हा हेतू मनात बाळगून स्वामीनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा अंगी बाळगून राजांचे प्राण वाचवण्यासाठी त्यांच्या संरक्षणासाठी बाजीप्रभू आपल्या भावासमवेत प्राणाचे बलिदान करतात. बाजीप्रभूंच्या पूर्वजांपासून, वंशजांपासून बाजीप्रभूपर्यंतचा सर्व इतिहास आपणास 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत वाचावयास मिळतो.

**कथानक :-**

'महारूद्र बाजीप्रभू' या अरविंद दाढे यांनी लिहिलेल्या कादंबरीची सुरूवात हिरडस मावळात वसलेल्या 'शिंद' गावच्या वर्णनाने होते. या मावळमधील त्रेपन्न गावचे देशपांडे वतन वैज्यप्रभूंना बिदरच्या मिर्झा अलिबेरीद शहाने बहाल केले होते. या त्रेपन्न गावचा कारभार शिंदमधून चालत असे. पिलाजीप्रभूंनी शहाजीराजांसोबत अनेक युद्धात भाग घेतला होता. पिलाजीप्रभूंना बाळाजीप्रभू आणि कृष्णाजीप्रभू ही दोन मुले होती. कृष्णाजीप्रभूंना तीन मुले होती आणि चौथ्या वेळी त्यांची पत्नी बयोबाई यांना दिवस गेले होते. त्यांचे दिवस आनंदात जात होते. महादेवाच्या पिंडीजवळ बसून काहीतरी वेगळे मागण्यात त्या नेहमी मग्न असत. कालांतराने त्यांना मुलगा होतो. चांद्रसेनीय कायस्थ परंपरेनुसार बाळाच्या पाचवीचा व बारशाचा कार्यक्रम पार पाडला जातो.

यानंतर कादंबरीमध्ये बाजीप्रभूंचे बालपण, त्यांच्यावर घडलेले संस्कार आणि त्यांच्या आवडी-निवडी याबाबतची माहिती येते. शहाजीराजे आणि पिलाजीप्रभू यांच्यामध्ये स्वराज्याविषयी केलेली सल्लामसलत हा भाग येतो. बांदल-देशपांडे यांच्यामध्ये युद्ध होते आणि बाजीप्रभू बांदलांचे दिवाण म्हणून कारभार पाहू लागतात. शिवाजीराजे घडणाऱ्या सर्व घटना साक्षीत्वाने पाहात होते. राजांना बांदल आणि देशपांडे आपलेच आहेत त्यामुळे त्यांनी स्वराज्यसाधनेत यावे असे मनोमन वाटत होते. त्यामुळेच राजे, बाजी बांदल आणि बाजीप्रभू देशपांडे यांना पत्र पाठवितात. त्या पत्राचा मजकूर कादंबरीमध्ये आलेला आहे.

शिवाजीराजे बाजीप्रभूंना भेटण्यासाठी व त्यांना आपल्या स्वराज्यात सामील करून घेण्याच्या हेतूने शिंदला जातात. कृष्णाजी बांदलांचा शिवाजी राजांनी बीमोड केल्यामुळे बाजीप्रभू संतापले होते. राजांच्या लक्षात ही गोष्ट येते व ते म्हणतात, "बाजी, तलवारीच्या मुठीवर असलेली तुमची मूठ काढा. आम्ही लढण्यासाठी आलो नाही बाजी ! माणसे तोडण्यासाठी नाही पण जोडण्यासाठी आम्ही आलो आहोत."[६] त्याचप्रमाणे राजे कृष्णाजी

बांदलाने केलेल्या अन्यायाची जाणीव करून देतात. राजांच्या बोलण्याने बाजी भारावून जातात. राजे आणि बाजींच्या भेटीचे वर्णन लेखकाने अतिशय रोमांचकारी पद्धतीने केले आहे. त्यानंतर बाजी देव, देश आणि धर्मासाठी राजांच्या पाठीशी उभे राहण्याची शपथ घेतात, ''खऱ्या अर्थाने देव, देश आणि धर्म यांचे जागरण करणाऱ्या शिवप्रभूंच्या पाठीशी आम्ही सदैव उभे राहू. आता आमचे जीवन आणि मरण श्रींच्या इच्छेने शिवाजीराजांच्या पायाशी असेल. आम्हा देशपांडेप्रभूंच्या कुलस्वामिनीच्या साक्षीने, आदिशक्ती मळाईमातेच्या शपथेने सांगतो, आबाजी ! आजपासून आम्ही आमच्या निष्ठा राजांच्या पायी वाहिल्यात.''[७] बाजीप्रभू स्वराज्यात आल्यामुळे राजांना शिवशंकराची महारूद्र शक्ती प्राप्त झाली होती. बाजींना गडकोटांच्या बांधणीचे ज्ञान होते. त्यामुळे बाजींच्या हिंदवी स्वराज्यात येण्याने कित्येक नवे गडकोट उभे करता येतील असा विचार राजांच्या मनात येतो.

बाजीप्रभू बांदलांसह राजगडावर राजांना भेटण्यास गेल्यावर त्यांचा त्याठिकाणी योग्य तो सन्मान होतो. लेखकाने जिजाऊ मातेचे वर्णन अतिशय समर्पकपणे केले आहे. जिजाऊमातेला माहीत असलेले राजकारणातले डावपेच व इतिहासाच्या गाढ्या अभ्यासाचे प्रत्यंतरदेखील याठिकाणी येते. शिवाजीराजे रोहिडखोऱ्याला भेट देण्यास जातात याचेही वर्णन समर्पकपणे आले आहे. राजे जावळीखोऱ्यात असलेल्या भोरप्या डोंगराची दुरूस्ती व त्याचे रूप पालटण्याचे काम बाजीप्रभूंवर सोपवतात. भोरप्या डोंगर म्हणजे 'प्रतापगड'. हा किल्ला अतिशय मजबूत असल्यामुळे आणि चोहोबाजूंनी दाट झाडी आणि दऱ्या असल्यामुळे शत्रूला ताब्यात घेण्यासाठी हा किल्ला कठीण होता.

अफजलखान आपल्या प्रचंड सैन्याबरोबर स्वराज्यावर चाल करून येत आहे हे राजांना समजताच राजे प्रतापगडावर जाण्याचे निश्चित करतात. अतिशय शिताफीने राजे अफजलखानाचा वध करतात. त्याचा वध केल्याने राजांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्यामुळेच ते कोल्हापूर पर्यंतचा परिसर अवघ्या पंधरा वीस दिवसांत काबीज

करतात. या गोष्टीमुळे अदिलशहाला प्रचंड हादरा बसतो आणि पुन्हा एकदा तो आणि बडी बेगम सिद्दी जौहरला साठ-सत्तर हजार फौज देऊन कोल्हापूरच्या दिशेने शिवाजीवर चाल करून पाठवतात. ही खबर राजांना मिळते त्याचबरोबर शाहिस्तेखानदेखील मराठमुलखाची राखरांगोळी करण्यासाठी येत आहे ही खबर राजांना मिळते. राजे चिंताक्रांत होतात. एका शत्रूचा संपूर्ण पाडाव करून दुसऱ्याचा समाचार घ्यायचा हा विचार करून राजे मिरजेचा वेढा उठवतात आणि स्वराज्याच्या सरहद्दीवर असणारा झुंजार किल्ला पन्हाळा या किल्ल्याकडे जातात.

पन्हाळागडावर जाता जाता त्यांची भेट शिवा काशिदशी होते. तो दिसायला अगदी राजांसारखाच होता. त्याला राजे आपल्याबरोबर घेतात. काही दिवसांतच सिद्दी जौहर पन्हाळगडाला वेढा घालतो व वेढा अगदी अव्वल ठेवतो. तो स्वत: घाटगस्तीच्या पहाऱ्यावर लक्ष ठेवून व घोडेस्वारांच्या पथकासह फिरता पहारा करीत होता. पावसाळ्यातही सिद्दीचा वेढा थोडासुद्धा ढिला पडला नव्हता.

राजांनी सर्व परिस्थितीचा विचार केला, आपल्या सहकाऱ्यांसह सल्लामसलत केली आणि गड सोडण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी शिवाला विचारले, ''शिवा, उद्या या शिवाजीसाठी तुला मरायला सांगितले तर काय करशील ?'' शिवा आत्मविश्वासाने म्हणतो, ''महाराज, भवानीची शपथ आहे. आता शब्द माघारी घेऊ नका. कसा आणि कुठं मरू एवढंच सांगा. माझ्यासारख्या हजारो शिवा काशिदचे प्रपंच सावरणारा अनेकांचा पोशिंदा वाचला पाहिजे.''[८] देशासाठी आणि राजासाठी प्राणपणाने लढणारी माणसे राजांजवळ होती. आषाढी पौर्णिमेच्या रात्री गड सोडण्याची योजना ठरते आणि ठरलेल्या वेळी अवघी तीनशे-चारशे माणसे घेऊन राजे जाण्यास निघतात. इथून पुढचा प्रसंग लेखकाने अतिशय सुंदर रीतीने वर्णन केलेला आहे. त्यामुळे आपल्या डोळ्यांसमोर सारा इतिहास उभा राहतो. शिवा काशिद तहाची बोलणी करण्यासाठी सिद्दीकडे जातो. परंतु थोड्याच वेळात त्याचे सोंग उघडे पडते

आणि त्याचा शिरच्छेद केला जातो. इकडे शत्रू जवळ येत असल्याचे कळताच बाजी राजांना पुढे जाण्याची विनंती करतात.

कोणत्याही परिस्थितीत खिंड चढून जाणे आवश्यक होते आणि त्या गजापूरच्या अरूंद खिंडीच्या तोंडावर शत्रूला थोपवून धरायचे याची कल्पना बाजीप्रभूंना येते आणि ते राजांना विशाळगडावर जाण्यास सांगतात. परंतु राजे तयार होत नाहीत ते म्हणतात, "नाही बाजी, तुम्हाला मरणाच्या तोंडी सोडून आम्हाला पुढे जाण्याची इच्छा नाही. आम्हीसुद्धा तुमच्या खांद्याला खांदा देऊन शत्रूशी झुंजू." बाजी परिस्थितीचा विचार करतात आणि वडीलकीच्या नात्याने ते म्हणतात, "राजे ! भवानीची शपथ आहे ! यावेळी आम्ही तुमचे काहीएक ऐकणार नाही. तुम्ही आधी पालखीत बसा अन् पुढे चालू लागा."[९]

बाजींच्या परखड बोलण्याने राजे विशाळगडाकडे जातात. खिंडीमध्ये बाजी महारूद्राच्या साक्षात्कारी रूपात लढत होते. कैलासात शिवतांडव झाल्याचा भास होत होता. खिंड अत्यंत अवघड होती. एकावेळी एक-दोनच माणसे चढून येऊ शकतील अशी चिंचोळी जागा होती. त्यामुळे शत्रूची कोंडी झाली होती. सिद्दी मसूदने बंदुकधारी हशमाकरवी बाजींवर गोळी झाडली अन् बाजी कोसळले. तरीही बाजी मावळ्यांना हिंमतीने लढण्यास सांगत होते. राजे विशाळगडावर पोहोचल्यानंतर तोफांचे आवाज करण्यात आले. तोफांचे आवाज ऐकून बाजी म्हणतात, "राजे, आम्ही आमचा शब्द पाळला. आता सुखाने, समाधानाने डोळे मिटतो. माझ्या शूरवीर मावळ्यांनो, तुम्हांलाही मुजरा."[१०] अशारितीने बाजींनी राजांना शेवटचा मुजरा करून प्राणत्याग केला.

राजांना गडावर पोहोचेपर्यंत जसवंतराव पालवणीकर आणि सूर्याजीराजे सुर्वे या आपल्या माणसांशीच कडवी झुंज द्यावी लागली होती. त्यामुळे राजांना अतिशय राग आला होता. पण त्यांचे लक्ष गजापूरच्या खिंडीकडे होते. थोड्याच वेळात बाजी-फुलाजीचे प्रेत असलेली पालखी गडावर येते. राजांना ते पाहताच काळजात धस्स होते. त्यांना अश्रू

आवरेनासे होतात. बाजींचं ते मृत शरीर पाहून राजांच्या मनामध्ये भावनांचा कल्लोळ माजला होता. बाजी-फुलाजी यांना अमृतेश्वराच्या मंदिरासमोर अग्नी देण्याची व्यवस्था केली होती. राजांसमोर बाजी भेटल्यापासून शेवटच्या भेटीपर्यंतचा सर्व इतिहास डोळ्यांसमोर उभा राहिला.

राजांनी त्यानंतर राजगडावर येऊन जिजाऊमातेला घडलेल्या सर्व घटना सविस्तरपणे सांगितल्या. त्यानंतर राजे आणि माँसाहेब शिंदमध्ये बाजींच्या वाड्यात त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी जातात. बाजींच्या जाण्यामुळे स्वराज्यातील एक अनमोल रत्न गेले होते. त्यामुळे राजे बाजींच्या पत्नी सोनाई आणि गौतमाईला त्यांनी आपल्याकडे काहीतरी मागावे अशी विनंती करतात आणि म्हणतात, ''आमच्या अनेक आया-बहिणींचे प्रपंच हिंदवी स्वराज्यासाठी गजाखिंडीत मोडलेत. त्यांची जबाबदारी आमच्याशिरी आहे. हे आम्ही कदापिही विसरणार नाही.''[११] राजांच्या बोलण्यावर गौतमाई व्यवस्थित विचार करून शस्त्रागारात जातात. शस्त्रागारातून एक रत्नजडित म्यान असलेली समशेर आणून म्हणतात, ''राजे, ही समशेर तुमच्या हाताने महादजीच्या कमरेला बांधा, अन् ज्या ज्या वेळी हिंदवी स्वराज्य अन् राजे अडचणीत येतील, त्या त्या वेळी देशपांडेप्रभूंना रक्त सांडण्याची संधी द्या.''[१२]

बाजीप्रभूंच्या पत्नी सोनाई-गौतमाई दु:खाने खचून न जाता त्यांचा मुलगा - महादजी याला स्वराज्याच्या कामी येण्यास संधी देण्याचे सांगतात. या गोष्टीमुळे साऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू जमा होतात. या ठिकाणी ही कादंबरी संपते.

'महारूद्र बाजीप्रभू' या कांदबरीमध्ये बाजीप्रभूंचा जीवनवृत्तांत, त्यांची स्वामीनिष्ठा व देशभक्ती याचे दर्शन घडते. त्याचप्रमाणे प्राणाचे मोल न बाळगता अखेरच्या श्वासापर्यंत लढणारे बाजी याठिकाणी दिसून येतात.

## २) कादंबरीतील संवाद :-

कादंबरीमध्ये जी व्यक्तिचित्रणे येतात त्यांच्या संवादाला विशेष असे महत्त्व आहे. प्रत्येकाच्या बोलण्याची शैली, ढब ही त्याच्या स्वभाववैशिष्ट्यांनुसार बनलेली असते. कथानक व व्यक्तिचित्रण ह्या दोहोंशी संवादाचा निकटचा संबंध असल्याने त्यांना विशेष महत्त्व असते. संवादाच्या माध्यमातून पात्रांना आपले हृदगत मोकळे करता येते. सरळसोट कथानिवेदनापेक्षा मधून-मधून संवाद आले तर त्यात वेधकपणा, चटकदारपणा व नाट्यात्मकता येते. त्याचबरोबर कथानकाला गती देण्याचे कामही संवाद करीत असतात. पत्रांच्या माध्यमातून लेखकाला आपल्या मनातील विचार, भावना व्यक्त करता येतात.

### १) 'पावनखिंड' या कादंबरीतील संवाद :-

'पावनखिंड' या कादंबरीमध्ये वर्णनापेक्षा संवादावर जास्त भर दिला गेला असल्याचे दिसून येते. बाजीप्रभू देशपांडे बांदलांचे दिवाण म्हणून कारभार पाहत असतात. एक दिवस बांदलास शिवाजी राजांचा खलिता येतो. ''काय म्हणतो शिवाजी भोसला ?''[१३] खलित्याच्या संदर्भात बोलण्यासाठी बांदल फुलाजींना बाजींना निरोप देण्यास सांगतात. त्याचप्रमाणे फुलाजी शिवाजीचा खलिता आल्याचे सांगतात. बाजी बांदलालाच आपला राजा मानत होते. शिवाजीराजे देखील स्वत:ला राजे म्हणवून घेतात याचा त्यांना राग होता. तोच संताप वरील वाक्यातून स्पष्ट होतो.

दादोजी कोंडदेव आणि बाजीप्रभू यांच्याशी केलेल्या या संवादावरून राजांचा संस्कृतचा सखोल अभ्यास होता हे समजते. कोणत्याही प्रकारची अंधश्रद्धा न बाळगता विचारपूर्वक आलेल्या प्रसंगाला सामोरे जाण्याची वृत्ती खालील संवादावरून लक्षात येते. त्याचप्रमाणे बाजींना स्वराज्यात सामील करून घेण्यासाठी जेव्हा राजे बाजींच्या गावी जातात त्यावेळेस बाजींजवळ असलेली पागा बघून त्यांना संस्कृतचा श्लोक सांगतात.

''नाही, दादोजी ! अमावस्येचं भय आम्हांला नाही. तुम्हीच आमची मुद्रा तयार केलीत ना ! प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता । साहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय

राजते ।। प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वृद्धिंगत होत जाणारी, विश्वानं वंदिलेली अशी शहाजीपुत्र शिवाची मुद्रा लोक कल्याणास्तव मानानं नांदते आहे. दादोजी, तो प्रतिपदेचा विजय घरी आणायचा झाला, तर त्याला अमावस्येलाच बाहेर पडायला हवं ! अमावस्या, प्रतिपदा, पौर्णिमा आम्हांला नेहमीच फलदायी ठरलेली आहे.''[१४]

''यस्याश्वा तस्य राज्यं, यस्याश्वा तस्य मेदिनी ।

यस्याश्वा तस्य सौख्यं, यस्याश्वा तस्य साम्राज्यम् ।।

- ज्याच्या पदरी घोडा त्याचं राज्य, त्याचं ऐश्वर्य, त्याचं सुख, त्याचं साम्राज्य ।''[१५]

त्याचप्रमाणे खालील संवादावरून राजांबद्दल बाजींच्या मनात असणारी चीड दिसून येते आणि त्यांच्या बोलण्याने राजांचा संताप अनावर होतो आणि ते बांदल-देशमुख यांनी रयतेवर केलेल्या अन्यायाची जाणीव बाजींना सडेतोड शब्दांत करून देतात.

'' 'बाजी, तुम्हांला माहीत नसेल, आमच्या तलवारीचं नाव भवानी आहे. ते आमचं कुलदैवत. ती बाहेर पडते, ती फक्त अन्यायाविरूद्ध. नाही, बाजी, आमची भवानी तलवार तुमच्याकरिता नाही. बाजी, तुम्ही आम्हांला हवे आहात.'

'कशाला ? पुंडाव्यासाठी ?' बाजी उपरोधाने म्हणाले.

'खामोश ! कुणावर आरोप करता हे ? खुद्द तुमचे वडील कृष्णाजी प्रभू शहाजीराजांच्या पथकात होते, हे विसरलात ? बारा मावळची जहागीर भोसल्यांची, पण बांदल देशमुख बळजबरीनं आमच्या भागात वसूल करू लागले. पुंडावा केला असेल, तर तो बांदल देशमुखांनी आणि त्यांना साथ करणाऱ्या वतनदारांनी. नाही, बाजी, आम्ही पुंडावा केला नाही. उलट, आम्ही पुंडाव्याचा बीमोड केला; करतो आहोत. मोरे, घोरपडे, सावंत यांनी का थोडी प्रजा गांजली ? येवढंच कशाला, आमचे खुद्द मामा, सुप्याचे मोहिते, त्यांनी असेच अत्याचार करायला सुरूवात केली. त्यांच्या मुसक्या आवळून आम्हांला त्यांना बंगळूरला पाठवावं लागलं.' ''[१६]

स्वराज्याला वडीलधारी माणसांची गरज होती. त्यामुळेच राजे बाजींना स्वराज्यात येण्यासाठी सुचवितात. ते म्हणतात,

"कशासाठी ! आम्ही चुकलो, तर आम्हांला योग्य सल्ला देण्यासाठी. आपल्या भूमीचं रक्षण करण्यासाठी. इथल्या माणसांत इभ्रत मिळविण्यासाठी आपले देव आणि देवळं सुरक्षित राखण्यासाठी. आपल्या आयाबहिणींची अब्रू रक्षण करण्यासाठी. नाही, बाजी, आम्ही परत सांगतो, आम्हांला राजेपणाची हौस नाही. ना जुलूम-जबरदस्तीची. कृष्णाजी बांदल आम्हांला सामोपचारानं मिळाले असते. तर आम्हांला ते हवं होतं. पण त्यांनीच वैर पत्करलं."[१७]

पुढील संवादावरून राजांच्या साधेपणाचे दर्शन घडते त्याचप्रमाणे राजांचे मोठेपण आणि रयतेविषयी त्यांच्या मनात असणारी कणव व तळमळ दिसून येते.

" 'विठोजी, हिला पाहून आमच्या सखूची आम्हांला आठवण झाली. आमच्या सखुबाई हिच्यासारख्याच आहेत. मुलगी भेटल्याचा आनंद झाला' आणि सखूकडं वळून ते म्हणाले, 'पोरी ! आम्ही दोन दिवस येथे आहोत, आम्ही आलो म्हणून पक्वान्न करू नको. आम्हांला ती चालत नाहीत. झुणका, भाकर, भाजी आम्हांला आवडते.' "[१८]

अफजलखानसारखा शत्रू स्वराज्यावर चाल करून येत असता आलेल्या संकटाला घाबरून न जाता विचारपूर्वक त्या संकटाशी सामना करण्याची दृष्टी पुढील उद्‍गारावरून दिसून येते.

"हाच तो अफजलखान की, ज्यानं कट करून बाजी घोरपडे आणि मुस्ताफखानामार्फत आमच्या वडिलांना, दाजीसाहेब महाराजांना जिंजीच्या छावणीत बेसावध, निद्राधीन असता पकडलं आणि याच उन्मत्त अफजलखानानं दाजीसाहेब महाराजांच्या पायांत बेड्या चढवून त्यांची विजापुरात धिंड काढली."

"मुळीच नाही ! अफजलभेटीची ही संधी आम्ही मुळीच सोडणार नाही. तर तो तरी राहील, नाहीतर आम्ही !"

"माँसाहेब, आम्ही उतावीळ नाही. करू, ते विचारानंच करू. पण ही संधी सोडली तर स्वराज्याचा डाव परत मांडता येणार नाही."[१९]

प्रस्तुत संवादावरून राजांच्या आत्मविश्वासपूर्ण बोलण्याचे दर्शन घडते. राजांच्या या आत्मविश्वासपूर्ण बोलण्यामुळेच त्यांचे सारे सहकारी नेहमी हसत-हसत संकटाशी सामना करण्यास तयार असत.

"वाट बघतच तो वाईला बसला आहे. बाजी, यापुढं अनेक संकटं आम्हांवर येणार आहेत. ती एकापेक्षा एक अशी वरचढ असणार. त्यांना सामोरं जायला आपलं बळ वाढवायला हवं ! खान आपल्या पावलांनी आला आहे. खानानं आणलेल्या तोफा, हत्ती, घोडदळ, बाडबिछायत आणि संपत्ती हे सर्व मिळायला हवं. तसं झालं, तर एका रात्रीत आपले मावळचे बारा गडकोट मातब्बर बनतील हा डाव हरून चालणार नाही."[२०]

जेव्हा सय्यदखानास राजांशी तह करण्यास स्वत: जाण्याविषयी सांगितले जाते. त्यावेळेस त्याची स्थिती डळमळीत होते हे त्याच्या या उद्‌गारावरून स्पष्टपणे दिसून येते. शिवाजीराजांची शत्रूच्या गोटात किती दहशत होती हे समजते.

" 'कौन ! हम ? कभी नहीं !' खान म्हणाला, 'तो खतरनाक शिवाजी, अफजलखानाचं पोट फाडलं. नहीं ! हम नहीं जायेंगे ! तुम जाओ ! जो सुलह करनी है, करो !' "[२१]

पन्हाळगडाचे गडकरी मानाजी नाईक यांची मुलगी तुळसा हिला सय्यदखान पळवून नेतो. राजांचे शिलेदार तिला माघारी आणतात. परंतु तुळसाला तिचे आईवडील स्वीकारण्यास नकार देतात. तेव्हा राजे तिला वडीलकीच्या नात्याने समजावतात आणि आपलीच मुलगी समजतात.

"मुली ! तुझा काही अपराध नाही. तुझ्या आई-बापानं तुला टाकलं, तरी आम्ही टाकणार नाही. यापुढं आमची जशी सखू, राजकुंवर तशी तू ऽऽ"[२२]

बाजी व फुलाजी यांच्या या संवादावरून सारी जनता राजांना देवच मानत होती हे स्पष्ट होते.

" 'खरं आहे !' बाजी म्हणाले, 'राजांची जाण फार मोठी ! कणवही तेवढीच. नाहीतर अफजलखानाची लढाई राजांनी जिंकलीच नसती. अठरा दिवसांत पन्हाळ्यापर्यंतचे एकवीस गड जिंकणं एवढं सोपं नव्हतं. काळ, वेळ आणि स्थळ यांचं भान बाळगणारा या राजाइतका कोणी नसेल.' "

" 'नसायला काय झालं ?' फुलाजी म्हणाले, 'नरसिंहाचा अवतार दुसरा कसला होता ? नारायण असूनही, हिरण्यकशिपूच्या वधासाठी ना पशू, ना मानव, असं रूप त्याला घ्यावं लागलं. त्याला प्रकटावं लागलं, ना दिवस ना रात्र अशा सांजवेळी, ना घरात ना बाहेर, अशा उंबरठ्यावर घेऊन त्याला हिरण्यकशिपूचा वध करावा लागला. कैक वेळा वाटतं, आपले राजे नरसिंहाचा अवतार आहेत.' "[२३]

प्रस्तुत राजांच्या उद्‌गारावरून राजांची निसर्गाकडे रसिक-कलावंतांप्रमाणे पाहण्याची दृष्टी स्पष्ट होते. त्याचप्रमाणे वरील निसर्गाच्या वर्णनाद्वारे राजांनी संकटाचेही वर्णन अतिशय समर्पकपणे केले आहे.

"केवढं विशाल रूप हे ! बाजी, संकट येतात ना, ती या वळीव पावसासारखीच असतात. काळे कभिन्न ढग उठतात. वारासुद्धा त्यांच्या भीतीनं दबून जातो. विजा लखलखू लागतात, कडाडतात. सारा आसमंत आपल्या आवाजानं भारून टाकतात. टपोऱ्या जलधारांच्या माऱ्याखाली सारी धरित्री भिजून जाते .... आणि पाऊस थांबतो, तेव्हा तृप्त झालेला सुगंध सर्वत्र दरवळतो. पिवळ्या किरणांत हळदीच्या नवरीसारखी धरित्री नटून जाते. आकाशाकडं पाहावं, तर सप्तरंगांची, इंद्रधनुष्याची कमान भाग्योदयाची वाट दाखवीत असते. नाही, बाजी ! संकट हे वरदान आहे. ती परीक्षा असते. जी माणसं त्या संकटांना सामोरी जातात त्यांचं यश सदैव वाढत जातं."[२४]

खालील वाक्यावरून राजांची संकटावर मात करून त्यावर कसल्याही परिस्थितीत विजय मिळविण्याची पराकोटीची इच्छाशक्ती दिसून येते.

''बाजी, ही टोपीकरांची जात फार हुशार, सातासमुद्रांवरून आलेत ना ! बोलून चालून व्यापारी. ते हा सौदा सोडतील कसा ? शास्ताखान चालून येतो, हे त्यांना माहीत असणार. सिद्दीच्या वेढ्यात आम्ही पुरे अडकलो आहो, हे ते जाणतात. या दुहेरी संकटातून आम्ही वाचणार नाही, हा त्यांचा अंदाज ! ठीक आहे. जगदंबेच्या कृपेनं आम्ही या संकटातून तरलो, तर त्या टोपीकरांना जरूर धडा शिकवू.''[२५]

बाजींच्या बोलण्यातून त्यांना राजांविषयी वाटणारी आस्था त्याचप्रमाणे स्वामीनिष्ठेपायी प्राणत्याग करण्याची इच्छा स्पष्ट होते.

''कोणत्या जन्माचं देणं देतो आहे, कुणास ठाऊक, या राजाचं प्रत्येक पाऊल पाहत असता वाटतं की, याच्यावरून जीव ओवाळून टाकावा ! त्याच्या रूपात हरवून जावं ! दादा, हा माणूस जगला नाही, तर काही होणार नाही. आमचा मुलुख, आमची माणसं अब्रूनं जगणार नाहीत.''[२६]

बाजी व शिवा काशिद यांच्यातील संवादावरून स्वामीनिष्ठेपायी त्याचप्रमाणे देव, देश आणि धर्मासाठी प्राणार्पण करण्याची तयारी दिसून येते.

''एवढी सोपी जोखीम नाही ही !'' बाजी म्हणाले, ''प्रसंग आला, तर जीव गमवावा लागेल, चालेल ?''

शिवाच्या चेहऱ्यावर तेच हास्य होतं. त्यानं सांगितलं, 'जीव ! त्याची बढाई कशाला सांगता ? कवाबी मरायचं नव्हं ? पन जीव ओवाळून टाकावं, असं कुणीतरी भेटायला हवं !'

'तुझ्याच नशिबी ते भाग्य आहे,' बाजी म्हणाले, 'रात्री राजांना घेऊन आम्ही गडाबाहेर जाणार आहोत. तुला दुसरे राजे बनायला हवं. दुर्दैवानं राजांची जाग मेटेकऱ्यांना

लागली, तर तुला राजे बनून सिद्दीच्या छावणीवर जावं लागेल. राजे वेढ्याबाहेर जाईपर्यंत तुला सिद्दीला गुंतवावं लागेल, आहे तयारी ?'

'असली संधी कोण सोडंल ? आता बेत बदलू नका, ती जोखीम माझी.'''[२७] शिवा म्हणाला.

शत्रूच्या दाढेत अडकूनदेखील शत्रूला प्रत्युत्तर देत न घाबरता व न डगमगता मृत्यूला कवटाळणारा शिवा याचा आपणास अभिमान वाटतो. केवढा हा त्याग !

''हरामखोर मी नव्हे ! मी माझ्या धन्यासाठी इथं आलो, हरामखोर तू ! बाप मेला, तरी त्याच्याकडं पाठ वळवली नाहीस. मी तसा नाही, सोंगातला का होईना, पण शिवाजी बनलो. बस्स ! जिवाचं सोनं झालं.''

'''फाजल ! सोंगातला शिवाजी झाला, म्हणून काय झालं ? तो कधी पालथा पडतो काय ?' एक असह्य वेदना शिवाच्या मुखावर प्रकटली, डोळे विस्फारले गेले. कनातीच्या दांडीला धरून घरंगळत ढासळत असता तो उद्गारला, 'राजे ऽऽ येतो ऽऽ मुज ....' ''[२८]

वडीलकीच्या नात्याने प्रसंगी राजांवर अधिकार गाजवणारे बाजी याठिकाणी दिसून येतात.

''मला सांगता ? या बाजीला ? राजे, ही सारी फौज माझी, बांदलांची आहे. प्रसंग ओढवून घेतलात, तर तुमच्या मुसक्या आवळून या पालखीतून तुम्हांला जावं लागेल. विंझाईशपत सांगतो, यात तिळमात्र बदल घडणार नाही. राजे बऱ्या बोलानं गड गाठा !''[२९]

अंगावर असंख्य इजा होऊनदेखील त्याचप्रमाणे पाठीत गोळी शिरली तरी बाजी त्वेषाने ओरडत होते. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी शत्रूशी लढा दिला.

''लढा ! जिवाचं मोल बाळगू नका. अजून राजे ऽऽ''[३०]

राजे विशाळगडावर सुखरूप पोहोचूनदेखील खिंडीत लढत असणाऱ्या मावळ्यांविषयी, बाजी-फुलाजींविषयी त्यांना वाटणारी विलक्षण आस्था, चिंता यामधून प्रकट होते.

''हा खेळणा कसला ! हा तो विशाळगड आहे. झुंजारराव, क्षणाचाही विलंब न लावता तोफेचा आवाज द्या. त्या गजाखिंडीत आमचे बाजी, फुलाजी, आमचे मावळे आमच्यासाठी प्राणपणानं खिंड लढवीत आहेत. बाजी होते, म्हणूनच आम्ही या संकटातून तरलो. आम्ही बाजींना पहिल्या तलवारीचा आणि पालखीचा मान देणार आहोत. झुंजारराव तोफेचा आवाज द्या. तो आवाज ऐकण्यासाठी बाजी उतावीळ असतील. आमच्या स्वराज्यासाठी आज बाजींनी आपल्या पराक्रमाने गजाखिंडीची पावनखिंड बनवली आहे.''[३१]

जीवनाच्या शेवटच्या क्षणीदेखील आपल्या सहकाऱ्यांना लढण्यास सांगणारे बाजी धन्य होत. शेवटी जाता-जाता आपल्या स्वामीस मुजरा करून निरोप घेतात.

''रडता कशाला ? त्या मसूदची खोड मोडा. आम्ही जातो. राजांना आमचा मुजरा सांगा ऽऽ मुजरा ऽऽ''[३२]

राजांचे बाजींवर अतिशय प्रेम होते. त्यामुळेच त्यांच्या जाण्याने राजे भावनाविवश होतात. त्यांना आपले अश्रू आवरता येत नाहीत. हेच या संवादावरून दिसून येते.

''बाजी ! काय केलंत हे ! पालखीचा मान कुठं जात होता का ? त्यासाठी हे करायला हवं होतं ? बाजी-फुलाजी .... काय केलंत हे !''[३३]

अशाप्रकारे 'पावनखिंड' या कादंबरीतील संवाद प्रसंग व पात्रानुसार अतिशय परिणामकारक व प्रभावी आहेत. अतिशय सूचक व नाट्यपूर्ण संवाद हे या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

### २) 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीतील संवाद :-

बाजीप्रभूंच्यावेळी त्यांच्या आई गरोदर असताना त्यांच्या डोहाळजेवणाचा कार्यक्रम ठेवला होता. त्यावेळी त्यांना काय वाटत होतं ते त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट होते. त्यावरून बाजीप्रभू जन्माला येण्याआधीच आपल्या आवडीनिवडी, इच्छा-आकांक्षा मातेकडून

व्यक्त करत होते. असं म्हणतात, ''गर्भाचिये आवडी मातेचा डोहाळा'' गर्भस्थ बालकाची आवड आईच्या डोहाळ्यातून प्रकटते.

''फुलांच्या धनुष्यबाणांनी शरसंधान नाही करावंसं वाटत आम्हांला.''

''मग आपणाला काय वाटतंय ?''

''आम्हांला भगवान महादेवाचं त्रिशूळ, डमरू हातात घ्यावंसं वाटतंय.''[३४]

प्रस्तुत वाक्यावरून कृष्णाजीप्रभूंनादेखील आपल्याला रूद्रपराक्रमी पुत्र होणार हा ठाम विश्वास होता हे दिसून येते.

''हे आपण बोलत नाही ! कदाचित उद्याच्या भविष्यात पराक्रमाची गाथा लिहिणारा कुणीतरी देशपांडे प्रभूंच्या घराण्याचा कुलदीपक रूद्रपराक्रमी पुरूषच आपल्या पोटातून बोलतोय असं आम्हांला आता जाणवू लागलंय.''[३५]

पिलाजीप्रभू आणि शहाजीराजे यांच्यात स्वराज्याच्या रक्षणाविषयी चर्चा चालू असताना शहाजीराजे अत्यंत भावपूर्ण आणि आत्मविश्वासाने शपथ घेतात. त्यांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम केले आहे.

''मी शहाजी भोसले या देवभूमीच्या स्वातंत्र्यासाठी आणि धर्म रक्षणासाठी कटिबद्ध असून प्रसंगी रक्तसुद्धा सांडू आणि आमचा मुलूख, आमचे लोक स्वतंत्र करू.''[३६]

शिवाजीराजांनी बाजीप्रभूंना पाहिलेले नसले तरी त्यांचा पराक्रम त्यांना माहीत होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन दादोजी कोंडदेव खालीलप्रमाणे करतात,

''महाराज, रणांगणात महापराक्रमी, देदीप्यमान, तेजोमय, रसरशीत, विद्युल्लतेच्या कडाडणाऱ्या प्रचंड लोळाप्रमाणे शत्रुसैन्यात हल्लकल्लोळ उठवून देणारे बाजींचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे.''[३७]

देशपांडे आणि बांदल यांच्यात युद्ध झाल्यानंतर त्यांच्यात समझोता होऊन बाजी बांदलांचे दिवाण होतात. परंतु राजांना ही गोष्ट मान्य नव्हती. बाजी बांदल आणि

बाजीप्रभू देशपांडे स्वराज्यात सामील व्हावेत यासाठी ते त्यांना भेटण्याचे ठरवितात. त्यावर जिजाऊमाता राजांना समजावतात. यावरून जिजाऊंच्या प्रगल्भ विचारसरणीचे दर्शन घडते.

''राजे, नुसती गुणी माणसे मिळवून चालत नाही. मिळालेली माणसे घडवावी लागतात.''[३८]

बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल यांसारखी माणसे स्वराज्यामध्ये आपल्याबरोबर असावीत असे राजांना वाटत होते. त्यामुळेच राजे बांदलांना पत्र लिहितात. त्याचप्रमाणे बाजीप्रभू देशपांडे यांनाही राजांनी अशाप्रकारे समजुतीचे पत्र लिहिले. यावरून राजांच्या मनात बांदल आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्याविषयी असणारा अपार आदर व आपुलकी दिसून येते. बांदलांना लिहिलेल्या पत्राचा नमुना पुढीलप्रमाणे पाहता येईल -

''चिरंजीव बाजी बांदल देशमुख, रोहिड खोरे यासी

प्रती राजश्री शिवाजी राजे आशीर्वाद. आपले वडील कृष्णाजीपंत बांदल देशमुख मारले गेले, या कारणे बहुत कष्टी आहात, आपल्या मनाला फार मोठे दुःख झाले याची आम्हाला जाणीव आहे. कारण काही झाले तरी बांदल आमचे आहेत. सुडाचे राजकारण करण्याची आमची पद्धत नाही. आमचा हेतू आपण मनी धरावा..........

बहुत काय लिहावे ?

लेखन सीमा.''[३९]

राजे बाजींना भेटण्यासाठी त्यांच्या गावी जातात. त्या ठिकाणी त्यांची भेट होते. परंतु बाजींच्या मनात अजूनही राजांविषयी राग आणि संताप असतो. त्यामुळे राजांना पाहून बाजींना संताप आल्याने त्यांचा हात नकळत तलवारीवर गेलेला पाहून राजे बोलतात, ''बाजी, तलवारीच्या मुठीवर असलेली तुमची मूठ काढा. आम्ही लढण्यासाठी आलो नाही बाजी ! माणसे तोडण्यासाठी नाही पण जोडण्यासाठी आम्ही आलो आहोत.''[४०]

'पावनखिंडी' मध्ये आलेला भाग इथंसुद्धा आलेला आहे. राजे बाजींना कृष्णाजी बांदलाने केलेल्या अन्यायाची जाणीव करून देतात आणि नकळत राजेंनी बाजींच्या अंत:करणाला हात घातल्याचेही या वाक्यावरून दिसून येते.

''किती वर्षे हे अत्याचार, अन्याय हिंदू समाजाने सहन करायचे ? ही सरंजामशाही आम्हांला मंजूर नाही. जेधे-बांदल यांच्यात नांदगावच्या जवळ कासारखिंडीत किती युद्धे झाली ते सांगा बाजी ?

जेध्यांच्या वतनात बांदल बेगुमानपणे घुसत होते. कधी वतनांच्या सीमेवरून तर कधी नीरेच्या पाण्यावरून जेधे-बांदल यांच्यात कटकटी होत असत. हे कृष्णाजी बांदलांच्या दिवाणास मंजूर होते काय ?''[४१]

राजे बाजींना स्वराज्यात सामील करून घेण्यात यशस्वी होतात. राजकारणातील एक डाव यशस्वीपणे जिंकतात. त्यामुळे आनंदित झाल्याने जिजाऊंसमोर बाजींबरोबर भेटीत झालेल्या घटना सविस्तरपणे सांगतात.

''माँसाहेब, आम्ही रोहिडखोऱ्यातलं राजकारण जिंकलं ! बांदलांच्या तेजस्वी समशेरी आणि बाजी बांदलांसारखी माणसे बाजीप्रभूंच्यासह स्वराज्यात आली .... उद्याच्या अडचणीच्या काळात आणि उद्याच्या रणसंग्रामात जेधे-बांदलांच्या समशेरी तेजाने तळपतील. त्यांच्या पराक्रमाने इतिहासाची पाने सुवर्णाच्या अक्षरांनी लिहिली जातील.''[४२]

बाजी स्वराज्यसाधनेत आल्याने राजगडावर राजे आणि जिजाऊंच्या भेटीसाठी गेले असता जिजाऊमाता बाजींशी गोड आर्जवी शब्दांमध्ये बोलतात. त्यांच्या या वाक्यावरून त्यांची स्वराज्यसाधनेची तळमळ दिसून येते.

''आज आमच्या मनी आनंदाच्या भावना दाटून आल्या आहेत. आजचा आनंद आमच्या हृदयात मावत नाही. रायरेश्वरी जेध्यांचे कारीलगत घेतलेली हिंदवी स्वराज्याची शपथ बाजीप्रभू आणि बांदल यांच्या स्वराज्य साधनेच्या कार्यात येण्यामुळे

परिपूर्णतेला पोहोचली असे आम्हांला वाटते ! आता ही शपथ साऱ्या मावळची एकमुखी झाली.''[४३]

जिजाऊंच्या इतिहासाचा अभ्यास किती सखोल होता याची प्रचीती प्रस्तुत उताऱ्यावरून येते. ऐकणाऱ्याच्या हृदयाला पीळ पडेल अशा भाषेत त्या इतिहासाची पाने उलगडत होत्या.

''आम्ही आजपर्यंतच्या जीवनात अनेक बरेवाईट चढउतार पाहिलेत. अंगावर शहारे आणणारे प्रसंग पाहिलेत आणि अनुभवले आहेत ! ......... या हिंदुस्थानची एक सनातन, शाश्वत, चिरंतन संस्कृती रामकृष्णांच्या पूर्वीपासून चालत आलेली ही सरळ सहिष्णू संस्कृती इस्लामच्या आक्रमणामुळे होत चालली आहे. त्याचे चटके आम्ही सोसत आहोत.

दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजीच्या क्रौर्याचे चटके सबंध हिंदुस्थानने सोसलेत. कामांध आणि वासनेने वखवखलेल्या त्या सुलतानने चितोडवर चाल केली, चितोडच्या महाराणी पद्मिनीला उचलून जनानखान्यात खेचण्यासाठी त्याने चाल केली. चितोडच्या रजपुतांनी पराक्रमाची परिसीमा केली. पण चितोडमध्ये आर्त किंकाळ्या फुटल्या. रजपुतांनी रक्ताचा सडा शिंपला. अनेक वीर धारातीर्थी पडले. पण यश नाही आलं.''

''त्या धीरोदात्त, चारित्र्यसंपन्न महाराणीने शील रक्षणासाठी पंधराशे स्त्रियांसह धगधगत्या अग्निकुंडात उड्या घेऊन जोहार केला ....... त्या अल्लाउद्दीन खिलजीच्या क्रौर्याचे चटके मराठ मुलखाला सुद्धा बसलेत. त्यानं आमचं मराठमोळं जीवन उद्ध्वस्त केलं.''[४४]

अफजलखान आपल्या हजारो सैनिकांसोबत स्वराज्यावर चाल करून येत असल्याची खबर राजांना मिळते. खानाशी मुकाबला करण्याच्या हेतूने राजे किल्ल्यांची डागडुजी आणि संरक्षणात्मक सज्जता ठेवण्याची कामगिरी बाजींवर सोपवण्याचे ठरवितात. त्यानुसार पत्र लिहितात. शके पंधराशे ऐंशी सालच्या वैशाख महिन्यात ते पत्र बाजींच्या हाती पडतं. त्यातील मजकूर पुढीलप्रमाणे -

''म ।। अनाम बाजीप्रभू प्रती राजश्री शिवाजी राजे सु ।। तिसा खमसैन अलफ जासलोड गड हिरडस मावळामध्ये आहे. तो गड उसपडला होता. त्याचे नाव मोहनगड ठेवून किल्ला बसवावा ...... याबद्दल तुम्हांस लिहिले असले तरी सदरहू लिहिलेप्रमाणेकिला मजबूत करून देणे मग तुम्ही किल्ल्याखाली उतरणे.

छ. १ रमजानु (मर्यादेयं विराजते) मोर्तबसुद.''[४५]

वरील पत्रावरून त्याकाळी मराठी भाषेवर असलेला फार्शी आणि उर्दू भाषेचा प्रभाव दिसून येतो.

राज्यांच्यावर कोणतेही संकट आले तरी देशपांडेप्रभूंचे दोन वाघासारखे पराक्रम करणारे दिव्य महापुरूष फुलाजी आणि बाजी राजांच्या बरोबर होते. त्यांच्या पराक्रमी वज्रमुठीचं संरक्षण राजांच्याभोवती होतं. देशपांडेप्रभूंच्या पराक्रमी परंपरेचा गर्व आणि सार्थ अभिमान सोनाई व गौतमाई या बाजींच्या दोन्ही पत्नींना होता. तरीही एकप्रकारची हुरहूर होतीच. त्यांना धीर देण्याच्या हेतूने बाजींच्या मातोश्री बयोबाई दुर्दम्य आत्मविश्वासाने बोलत होत्या.

''अहो, राजांच्यावर कसलंही भयानक संकट आलं तरीसुद्धा आमचे देशपांड्यांचे बलराम-कृष्ण राजांच्या समवेत आहेत. राजांना भयंकर संकटातून आणि अडीअडचणीतून ते बाहेर काढल्याशिवाय राहणार नाहीत.''[४६]

पन्हाळगडावर असताना राजे महालक्ष्मीच्या दर्शनाला जात होते. त्यावेळेस त्यांना महालक्ष्मीच्या रूपात आदिशक्ती महिषासुरमर्दिनी, तुळजाभवानीचा भास होतो आणि ती आपल्याला जणूकाही आदेशच देत आहे असे राजांना वाटते.

''अरे राजा, ही क्षणाची मरगळ सोड. तुझा जन्मच धर्मरक्षणासाठी आहे, 'या भूमंडळाचे ठाई धर्मरक्षि ऐसा नाही' हे समर्थांचे उद्‌गार आठव आणि जिद्दीने उभा राहा.''[४७]

पुढील संवादावरून शिवा काशिदची स्वामीनिष्ठा आणि आपल्या राजावर असणारी निस्सीम भक्ती याचे दर्शन घडते. राजांच्या स्वराज्यसाधनेमध्ये कशाचीही पर्वा न

करता देशासाठी, स्वामीसाठी प्राणत्याग करण्याची तयारी असणारी अनेक माणसे होती.

"शिवा, उद्या या शिवाजीसाठी तुला मरायला सांगितले तर काय करशील ?"

"महाराज, भवानीची शपथ आहे. आता शब्द माघारी घेऊ नका. कसा आणि कुठं मरू एवढंच सांगा - माझ्यासारख्या हजारो शिवा काशिदचे प्रपंच सावरणारा अनेकांचा पोशिंदा वाचला पाहिजे !"[४८]

शिवाजीराजे व शिवा काशिद यांच्या पुढील संवादामुळे आपोआपच आपल्या भावना उचंबळून येतात. मरणाला देखील न घाबरणारी माणसे राजांच्या स्वराज्यसाधनेत होती. पन्हाळगडावरून विशाळगडाकडे जाण्यासाठी राजांना शिवाची खरी गरज होती.

"शिवा, हा जगदंबेचा पोत आहे. आमच्या श्रद्धेचा, भावभक्तीचा हा पोत आम्ही तुझ्या गळ्यात घालत आहोत. या पोतावरून शिवाजी ओळखला जातो. माझ्या गळ्यातील हा पोत साऱ्या शत्रूंना माहीत आहे. त्या जगदंबेच्या पोताला कमीपणा येईल असा वागू नको."

शिवाचे डोळे राजांच्या बोलण्याने पाणावले आणि तो म्हणाला, "मी एक सामान्य न्हावी. पण औटघटकेचा का होईना 'शिवाजी राजा' झालो. आता अगदी आनंदानं, धैर्यानं राजाच्या मरणानं मरेन. माझ्या जन्माचं सार्थक झालं !"[४९]

राजांना बाजींना गजापूरच्या खिंडीत लढण्यास एकटे सोडून जावेसे वाटत नव्हते. परंतु बाजी प्रसंग ओळखून वडीलकीच्या नात्याने त्यांना आज्ञा देतात. यावरून अडचणीच्या वेळी मागे-पुढे न बघता योग्य निर्णय घेण्याची शक्ती दिसून येते.

"नाही बाजी, तुम्हांला मरणाच्या तोंडी सोडून आम्हांला पुढे जाण्याची इच्छा नाही. आम्हीसुद्धा तुमच्या खांद्याला खांदा देऊन शत्रूशी झुंजू."

बाजींनी भेदक नजर रोखून राजांच्याकडे पाहिले अन् म्हणाले,

"राजे ! भवानीची शपथ आहे ! यावेळी आम्ही तुमचे काहीएक ऐकणार नाही. तुम्ही आधी पालखीत बसा अन् पुढे चालू लागा."[५०]

गजापूरच्या खिंडीत लढत असताना फुलाजी-बाजींच्या अंगावर असंख्य जखमा झालेल्या असतानाही लढण्यासाठी, ध्येयपूर्तीसाठी मरणाची चढाओढ लावणारी माणसे याठिकाणी दिसून येतात.

"नाही, नाही बाजी, आम्ही मोठे आहोत. आम्ही पुढेच असायला हवे. तुम्ही लहान आहात. तुम्ही मागे हटा. विश्रांती घ्या."[५१]

राजांनी विशाळगडावर पोहोचल्यानंतर तोफेचा आवाज केल्याशिवाय जागेवरून हलणार नाही असे बाजींनी राजांना सांगितले होते आणि त्यामुळेच त्यांनी मरणालादेखील थोपवून ठेवले होते. शिवाजीराजे गडावर पोहोचल्यानंतर तोफेचा आवाज ऐकून बाजी राजांना शेवटचा मुजरा करून आपल्या महायात्रेला प्रयाण करतात.

"राजे, आम्ही आमचा शब्द पाळला. आता सुखाने, समाधानाने डोळे मिटतो. माझ्या शूरवीर मावळ्यांनो, तुम्हांलाही मुजरा."[५२]

बाजी-फुलाजींची प्रेते पालखीतून विशाळगडावर आणली जातात. बाजींचं मृत शरीर पाहून राजांच्या मनात भावनांचा कल्लोळ माजला होता. या यज्ञासाठी अजून किती समिधा हवन करायला हव्यात हेच त्यांना समजत नव्हतं. भावनेपुढे कर्तव्य श्रेष्ठ ठरते. साऱ्या मावळ्यांना, धारकऱ्यांना, जीवाभावाच्या साथीदारांना धीर देणं राजाचं प्रथम कर्तव्य होतं आणि त्यामुळेच राजे आपल्या सहकाऱ्यांना आज्ञा देतात.

"महारूद्र मृत्युंजय बाजीप्रभू आणि फुलाजीप्रभू यांना इतमामानं अमृतेश्वराच्या मंदिरासमोर अग्नी देण्याची व्यवस्था करावी."[५३]

बाजी-फुलाजींच्या चितेला अग्नी देऊन आल्यानंतर मात्र राजांना आपल्या भावनेला आवर घालणे कठीण होते आणि ते भडभडून बोलू लागतात. ते वाचताना आपलेही

अंत:करण विषण्ण होते. अंत:करणाचा ठाव घेणारे संवाद इथे आले आहेत. बाजीप्रभू व फुलाजीप्रभूंचे बलिदान यामुळे काळीज भरून येते.

''बाजी, काय केलंत हे ? राजे तुम्ही पुढे व्हा, आम्ही मागावून गडावर दर्शनाला येतो असं म्हणाला होतात ना ! मग बाजी असल्या का दर्शनाला यायचं होतं गडावर ?''[५४]

विशाळगडावरून राजे राजगडावर बऱ्याच दिवसांनी येतात तेव्हा आपली जिवाभावाची माणसे गमावून त्यांची मन:स्थिती अतिशय बिकट झालेली होती आणि त्यामुळेच ते जिजाऊंसमोर आपले अंत:करण उघड करतात.

''माँसाहेब, आज आमच्याने काही बोलवत नाही. माँसाहेब, खरंच का राजेपण इतके अवघड असतं ?''[५५]

राजे दु:खातून सावरल्यानंतर जिजाऊंची भेट घेतात आणि पन्हाळ्यापासून विशाळगडापर्यंत पोहोचेपर्यंत त्यांना व त्यांच्या साथीदारांना शत्रूशी कराव्या लागणाऱ्या सामन्याची हकीकत ते वर्णन करतात.

''आईसाहेब, आमचा सारा खजिना जरी आम्ही ओतला तरीसुद्धा ही माणसं विकत मिळणार नाहीत.''[५६]

राजे व जिजाऊमाता बाजी-फुलाजींच्या कुटुंबाचे सांत्वन करण्याकरिता गेले त्यावेळेस जिजाऊमातांनी पुढील शब्दांत त्यांचे सांत्वन केले,

''बाजी महारूद्र होते, हिंदवी स्वराज्याचा अनमोल ठेवा होते. ते जाण्यानं केवळ देशपांडे यांचंच नुकसान झालंय असं नाही. आम्हा सर्वांचंच फार मोठं नुकसान झालंय. हिंदवी स्वराज्याचं अनमोल रत्न गजाखिंडीत हरवलं. ते कशानेही भरून येणार नाही याची आम्हांला कल्पना आहे ............''[५७]

राजे बाजींच्या घरी त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी गेले असता बाजींच्या घरच्यांनी आपल्याकडे काहीतरी मागावे अशी इच्छा ते व्यक्त करतात. त्यावेळेस

बाजींच्या पत्नी गौतमाई शस्त्रगारातील समशेर राजांच्या हाती देतात व पुढील उद्‌गार काढतात. यावरून देशपांडेप्रभूंच्या घराण्याचा धीरोदात्तपणा स्पष्ट होतो. दु:खातसुद्धा एक उदात्त भावना फक्त मराठी मातीच्या इतिहासात निर्माण होऊ शकते हे यावरून प्रचीतीस येते.

"राजे, ही समशेर तुमच्या हाताने महादजीच्या कमरेला बांधा, अन् ज्या ज्या वेळी हिंदवी स्वराज्य अन् राजे अडचणीत येतील, त्या त्या वेळी देशपांडेप्रभूंना रक्त सांडण्याची संधी द्या."[५८]

अशाप्रकारे 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबरीतील संवाद अतिशय प्रभावी आहेत. त्याचप्रमाणे ते अंत:करणाला हात घालणारे आहेत. जणू काही हे सारे आपल्या डोळ्यांसमोर घडते आहे असा भास या संवादातून प्रकट होताना दिसतो. दोन्ही कादंबरीच्या लेखकांनी सारा इतिहास आपल्या डोळ्यांसमोर वरील संवादाद्वारे उभा केलेला आहे.

**३) व्यक्तिरेखा :-**

ललित वाङ्‌मयामध्ये कथा-कादंबरी-नाटक हे तीन प्रमुख वाङ्‌मयप्रकार आहेत. या तिन्ही प्रकारच्या वाङ्‌मयात कथात्मक भाग असतो. कथा, कथानक आणि व्यक्तिलेखन या महत्त्वपूर्ण वाङ्‌मयतंत्र घटकांचे साधर्म्य ह्या तीन वाङ्‌मयप्रकारात आढळते. जसे काही साधर्म्य आहे तसेच काहीसे वैधर्म्यही आहे. व्यक्तिरेखनातील साम्य-विरोधाचा विचार आपल्याला अभिप्रेत असतो. या संदर्भात क्लेटन हॅमिल्टन यांनी म्हटले आहे -

"The Novelist delineates his characters directly, by exposition, by description, by reports from other characters, by psychological analysis; or he may delineate them indirectly - by their speech, by their action, by their effect on other characters or by an infimate projection of their environment. But these many experiments, in the instance of the dramatist, are cut down

to berelly move than two or three. His main method of depicting characters is by showing what they do. Secondarily, he may vely on what they say, and on their way of saying it. And in the third place, he may sometimes utilize the suggestions of environment - as when character is hinted at by the aspect of the room in which he habitually lives - or may employ the subtie indirect expedient of setting forth the effect of a dominate but absent character in a group of present but subsidiary figures."[५१]

म्हणजे दर्शन, वर्णन वृत्तांत, मनोविश्लेषण, कृती, भाषा, परिस्थिती अनेक गोष्टींच्या साहाय्याने कथाकार-कादंबरीकार व्यक्तिरेखन करीत असतो. व्यक्तिरेखन सुस्पष्ट होण्यासाठी कथा-कादंबरीत वर्णनाचा, निवेदनाचा वापर केला जातो. मनोविश्लेषण हा व्यक्तिरेखनाचा प्राणभूत घटक आहे. कथा-कादंबरी-नाटक ह्या वाङ्मयप्रकारात या घटकाची आवश्यकता नितांत आहे.

रचनाप्रधान कादंबऱ्या व व्यक्तिदर्शनप्रधान अशा कादंबरीच्या दोन जाती मानल्या जातात. त्यापैकी व्यक्तिदर्शनप्रधान कादंबऱ्या श्रेष्ठ समजल्या जातात. 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्या व्यक्तिदर्शनप्रधान कादंबऱ्या आहेत. यातील प्रमुख व्यक्तिरेखा बाजीप्रभू देशपांडे ही आहे. त्याचप्रमाणे इतरही अनेक पात्रांचा यामध्ये समावेश केलेला आहे. ही महत्त्वाची आणि गौण पात्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील -

**१) 'पावनखिंड' या कादंबरीतील व्यक्तिरेखा :-**

**१) बाजीप्रभू देशपांडे :-**

'पावनखिंड' या कादंबरीचा नायक 'बाजीप्रभू देशपांडे' होय. बाजीप्रभू देशपांडे ही या कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. बाजीप्रभूंच्या आयुष्यातील शिवाजी महाराजांची भेट झाल्यापासून तो महाराजांसाठी गजाखिंडीत देह ठेवीपर्यंतचा कथाभाग या कादंबरीत येतो.

रणजित देसाईंच्या इतर कादंबऱ्यांतील पात्रांप्रमाणे बाजीप्रभू देशपांडे हे काही त्या काळातील लोकप्रिय आणि केंद्रिय व्यक्तिमत्त्व नव्हते. शिवाजी, माधवराव यांच्या तुलनेत बाजीप्रभू हे तशा अर्थाने दुय्यम स्वरूपाचे व्यक्तिमत्त्व होय. परंतु रणजित देसाईंनी या बाजीप्रभूंच्याच जीवनातील अंतिम क्षणाला अतिशय सुरेख असे रूप या कादंबरीद्वारे दिले आहे.

पराक्रमी, प्रेमळ आणि बुद्धिमान असलेले बाजीप्रभू बांदलांचे दिवाण होते. त्यांची योग्यता लक्षात घेऊन शिवाजी राजे त्यांना आपल्या गोटात सामील करून घेण्याचा प्रयत्न करतात व त्यासाठी ते आपल्या मावळ्यांसोबत रोहिडा किल्ल्यावर जातात. त्या ठिकाणी छोटीशी लढाई होते व त्यात कृष्णाजी बांदल मारले जातात हे पाहून बाजी चिडतात. परंतु शिवाजीराजांना पाहताच क्षणभर युद्धाचं भान विसरून बाजी त्यांच्याकडे पाहतात.

'न ओळखायला काय झालं ! बेसावध शत्रूवर अचानक हल्ला करणारा दुसरा कोण असणार ?'[६०]

या वाक्यावरून बाजींच्या मनात राजेंविषयी असणारा प्रचंड राग आणि संताप दिसून येतो. परंतु ज्यावेळेस राजे त्यांना कृष्णाजी बांदलाने केलेल्या अत्याचाराची जाणीव करून देतात. त्यावेळेस बाजी भावनाशील होतात. त्यांच्या हातातील पट्टा गळून पडतो आणि ते राजांच्या गोटात सामील होतात. ते शांत, संयमी आणि विचारी होते. देवावर आणि शिवाजी राजांवर त्यांची नितांत श्रद्धा होती.

राजेंबद्दल बाजींच्या मनात पराकोटीचा आदर आणि प्रेम होते. ज्यावेळेस सिद्दी जौहर पन्हाळ्याला वेढा घालून बसतो. त्यावेळेस ''कोणत्या जन्माचं देणं देतो आहे, कुणास ठाऊक. या राजाचं प्रत्येक पाऊल पाहत असता वाटतं की, याच्यावरून जीव ओवाळून टाकावा ! त्याच्या रूपात हरवून जावं ! दादा, हा माणूस जगला नाही, तर काहीही होणार नाही. आमचा मुलूख, आमची माणसं अब्रूनं जगणार नाहींत.''[६१] राजांच्याविषयी त्यांच्या

मनात असणारी भावना व तळमळ ते आपल्या भावाजवळ व्यक्त करतात. राजावर, प्रजेवर आणि कुटुंबियांवर प्रेम करण्यासाठी आवश्यक असणारा मनाचा मोठेपणा त्यांच्याजवळ होता.

सिद्दी जौहर पन्हाळगडाला अनेक दिवस तळ ठोकून राहतो. त्या काळात त्याने वेढा अतिशय अव्वल ठेवला होता. बाहेरची बातमी आत आणि आतली बातमी बाहेर पोहोचण्याची कोणतीच संधी मिळत नव्हती. तो आपल्या शरणागतीची वाट पाहत असणार अशी शक्यता राजांनी बोलून दाखवताच,

''वाट बघ, म्हणावं ! वेळ आलीच, तर मारू किंवा मरू''[६२] असे संतापाने उफाळून बाजी उद्गार काढतात. यातून त्याच्या अंगी असणाऱ्या वीरवृत्तीची कल्पना येते.

देव, देश आणि धर्मासाठी, स्वामीनिष्ठेसाठी प्राणाचीही पर्वा न करता सतत झुंज देत राहण्याची बाजींची वीरवृत्ती या ठिकाणी दिसून येते.

पन्हाळगडावरून जाण्याची तयारी करत असताना बाजी शिवा न्हाव्यावर एक जोखीम सोपवितात. ते म्हणतात,

''तुझ्याच नशिबी ते भाग्य आहे. रात्री राजांना घेऊन आम्ही गडाबाहेर जाणार आहोत. तुला दुसरे राजे बनायला हवं. दुर्दैवानं राजांची जाग मेटेकऱ्यांना लागली, तर तुला राजे बनून सिद्दीच्या छावणीवर जावं लागेल. राजे वेढ्याबाहेर जाईपर्यंत तुला सिद्दीला गुंतवावं लागेल. आहे तयारी ?''[६३]

वेढ्याबाहेर पडल्यानंतर थोड्याच वेळेत पालखीचा पाठलाग सुरू होतो. तेव्हा राजांची पालखी गजापूरच्या खिंडीपर्यंत आलेली असते. बाजी राजांना पुढे जाण्याचे सुचवितात परंतु राजे बाजींना सोडून जाण्यास तयार होत नाहीत. त्यावेळी नाईलाजास्तव बाजी म्हणतात, ''मला सांगता ? या बाजीला ? राजे, ही सारी फौज माझी, बांदलांची आहे. प्रसंग ओढवून घेतलात, तर तुमच्या मुसक्या आवळून या पालखीतून तुम्हांला जावं लागेल. विंझाईशपत सांगतो यात तिळमात्र बदल घडणार नाही. राजे बऱ्या बोलानं गड गाठा !''[६४] अशाप्रकारे

बाजी प्रसंग ओळखून वडीलकीचा अधिकार गाजविताना या ठिकाणी दिसतात व त्यासाठी क्षमा देखील मागतात.

सिद्दी मसूदच्या माणसाने बाजींवर गोळी झाडली तरी त्यांची अखेरच्या श्वासापर्यंत असणारी लढण्याची तयारी त्यांच्या ''लढा ! जिवाचं मोल बाळगू नका. अजून राजे ऽऽ''[६५] या वाक्यावरून दिसून येते. यामुळेच जीवनाचा शेवट डोळ्याला दिसत असतानाही त्यांचे कान तोफांच्या आवाजाकडे लागलेले असतात. खुणेच्या तोफेचा आवाज ऐकल्यानंतर ते मावळ्यांना म्हणतात, ''रडता कशाला ? त्या मसूदची खोड मोडा. आम्ही जातो. राजांना आमचा मुजरा सांगा ऽऽ मुजरा ऽऽ''[६६]

जीवनाच्या शेवटच्या क्षणीदेखील बाजी राजांना अखेरचा मुजरा करण्यास विसरत नाहीत. स्वप्राणांची बाजी लावून बाजीप्रभू राजांना वाचवतो. अशाप्रकारे वरील सर्व घटना-प्रसंगाद्वारे लेखकाने बार्जीची व्यक्तिरेखा उभी केलेली आहे.

**२) शिवाजीराजे :-**

शिवाजीराजे हे काही 'पावनखिंड' या कादंबरीचे नायक नव्हते. पण बाजीप्रभू देशपांडे यांच्या बरोबरीने त्यांना या कादंबरीत प्राधान्य दिलेले जाणवते. वस्तुत: सर्वच शिवशाहीवरील कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी शिवाजीराजेच आहेत. पण ज्या घटना घडल्या त्यात राजे हे सगळीकडे पार्श्वभूमीसारखे आहेत. पावनखिंडीमध्ये राजांचे प्रथम दर्शन घडते ते कृष्णाजी बांदलांचा रोहिडा किल्ला घेण्याच्या वेळी. त्यावेळी आपापसात छोटी लढाई होते व त्यात राजांकडून कृष्णाजी बांदल मारले जातात. यामुळे बाजी अतिशय संतापतात. त्यावर राजे बाजींना म्हणतात, ''बाजी, तुम्हांला माहीत नसेल, आमच्या तलवारीचं नाव भवानी आहे. ते आमचं कुलदैवत. ती बाहेर पडते, ती फक्त अन्यायाविरूद्ध. नाही, बाजी, आमची भवानी तलवार तुमच्याकरिता नाही. बाजी, तुम्ही आम्हांला हवे आहात.''[६७]

राजांचे व्यक्तिमत्त्व असामान्य कोटीतील होते आणि रणजित देसाईंनी अतिशय समर्थपणे ते चित्रित केलेले जाणवते. राजांची गुणग्राहकता, मुत्सद्देगिरी आणि दूरदृष्टी संपूर्ण कादंबरीत जाणवते.

''विठोजी ! हिला पाहून आमच्या सखूची आम्हांला आठवण झाली. आमच्या सखुबाई हिच्यासारख्याच आहेत. मुलगी भेटल्याचा आनंद झाला.''[६८]

शिवाजीराजे चारित्र्यसंपन्न होते. शत्रूंच्या स्त्रियांचादेखील त्यांनी आई-बहिणीप्रमाणे आदर केला. 'ज्याला यश पाहिजे त्याने स्त्री अभिलाषा धरू नये. स्त्री ही मराठ्यांच्या देव्हाऱ्यातील देवता आहे' असे उद्‌गार शिवरायांनी वेळोवेळी काढले.

''दृष्टांत वगैरे काही झाला नव्हता. ही दृष्टी आम्हांला दादोजींनी दिली. चाणक्य काळापासून राजनीतीत ही गोष्ट आहे. गडांचा खजिना जेव्हा सुरक्षित राखायचा असतो, तेव्हा हीच पद्धत अवलंबली जाते.''[६९] यावरून राजांचा इतिहासाचा अभ्यास आणि राजकारणाची जाण लक्षात येते.

''१६५९ मध्ये अफजलखान शिवाजींच्या अंदाजाप्रमाणे स्वराज्यावर चालून आला. राजे जय्यत तयारीत होते. पाच हजार सैन्यानिशी स्वागताला दुर्गम जावळीच्या खोऱ्यात तयार होते. अत्यंत सावधगिरीने आवश्यक ती तयारी झाली होती. शिवाजीराजांनी फक्त एकटा खानच नाही तर फौजेसह यावा वा जावळीच्या खोऱ्यात त्याने तळ ठोकावा अशी तजवीज केली. कुशल योद्धा, कपटी, क्रूर, आक्रमक असलेल्या अफजलला त्यांना परत जाऊ द्यायचे नव्हते. त्यामुळे शिवाजींनी आपल्या फौजा जावळीच्या खोऱ्यात आणल्या होत्या. खानाला मारणे हा एकच हेतू नव्हता. भव्य योजनेतील तो एक छोटा भाग होता. खानाला फौजेसह नष्ट करण्याचा राजांचा डाव होता. यात त्यांचा लष्करी फायदा होणार होता. बारा हजार फौजेसह खानाला मारण्याचे नियोजन त्यांनी केले व ते कापून काढण्यात यशही मिळवले. महिनोन् महिने व्यवस्थित रचना करून, शत्रूला ठराविक ठिकाणी आणून, त्यांचा संपूर्ण नाश

घडवून आणण्याची जी योजना त्यांनी आखली, ती शंभर टक्के यशस्वी करून प्रचंड लूट मिळवली. हत्ती, घोडे यांसह सैन्यही मिळाले. हे त्यांच्या सावध नियोजनाचेच फळ होते. त्यांची सावधगिरी त्यांच्या भावी नियोजनाचे बीज ठरत गेली. त्यांनी तयारी केली नसती तर तो असावधपणा घातक ठरला असता. विश्वासघातालाच प्रवृत्त झालेल्या अफजलखानाशी शिवाजीराजे सरळपणाने वागले असते तर मारले गेले असते. राष्ट्र जिवंत ठेवण्यासाठी राष्ट्रधर्माच्या प्रणेत्याने दुसऱ्याच्या मनातील कपटनीती ओळखली पाहिजे. 'संक्षेपो नीतिशास्त्राणामविश्वास: परोमत:।' हे महाभारतातील वचन हेच सांगते की कोणाचा विश्वास धरू नये. राजकारणात शत्रूशी वागताना विश्वास टाकण्याचे धोरण घातकी ठरते. 'ज्याच्यामुळे मोठ्या कष्टाने उभे केलेले सैन्य, आपली भूमी, भूमीवरील प्रजानन नष्ट होण्याचे भय निर्माण होते. ज्याच्यामुळे राष्ट्रघात होण्याची शक्यता निर्माण होते, त्यावेळी धर्माधर्माचा विचार न करता जेवढे अधिक कठोर, क्रूर, कपटी होता येईल तितके होऊन शत्रूचा नायनाट केला पाहिजे' असे भारतीय तत्त्ववेत्त्यांनी निर्भयपणे सांगून ठेवलेले राजे जाणत होते. म्हणूनच राष्ट्रावरचे संकट ओळखून त्यांनी अफजलखानाला ठार मारले.''[७०]

सिद्दी पावसाळा सुरू झाल्यावर वेढा न उठवता तो पावसाळी छावणीची तयारी करतो. राजे म्हणतात की, तो आपल्या शरणागतीची वाट पाहतो आहे. तेव्हा बाजी उसळतात. तेव्हाही राजे रजपूताचे उदाहरण देतात. नेताजीचा पराभव झाल्याची बातमी ऐकूनही राजे निराश न होता सिद्दीचे कौतुकच करतात. आपल्यासाठी शिवा न्हावी शिवाजी बनून जाणार आहे या कल्पनेन राजे उदास होतात आणि वास्तवाला सामोरे जाऊन त्याच्या गळ्यात कवड्याची माळ घालतात. गजाखिंडीत शत्रू जवळ आल्याचे कळताच बाजी राजांना विशाळगडाकडे जाण्यास सांगतात. त्यावेळी राजे म्हणतात, ''नाही, बाजी! तुम्हांला सोडून आम्ही जाणार नाही. जे व्हायचं असेल, ते होऊ दे.''[७१] शेवटी नाईलाजाने राजे विशाळगडाकडे जाण्यास निघतात.

स्वराज्याच्या पटावरून बाजींच्या रूपाने आणखी एक मोहरा नाहिसा होतो. त्यामुळे राजे अधिकच विमनस्क होतात. बाजींचे मृत शरीर पाहून त्यांच्या भावना उफाळून येतात. ते म्हणतात, ''बाजी ! काय केलंत हे ! पालखीचा मान कुठं जात होता का ? यासाठी हे करायला हवं होतं ? बाजी-फुलाजी ..... काय केलंत हे !''[७९]

एकंदरित 'पावनखिंड' या कादंबरीत राजे एक मुत्सद्दी, दूरदृष्टी असलेले, प्रजाहितदक्ष, पराक्रमी राजा म्हणून शिवाजी महाराज आपल्या ध्यानी राहतात.

**३) शिवा न्हावी :-**

'पावनखिंड' या कादंबरीत असलेली 'शिवा न्हावी' ही व्यक्तिरेखा राजांच्या दृष्टीने येथे अतिशय महत्त्वाची अशी आहे. स्वराज्याच्या निर्मितीचे शिवरायांचे स्वप्न साकार करण्यामध्ये ज्या वीरांनी बलिदान दिले त्यामध्ये 'वीर शिवा काशीद' या मराठा वीराची गणना करावीच लागेल.

पाडव्याच्या दिवशी पन्हाळगडावर सोंगाड्याच्या खेळात शिवा न्हावी प्रथम राजांच्या नजरेसमोर येतो. इ.स. १६६० मध्ये पावसाळ्यात वेढ्याला ४ महिने झालेले होते व वेढ्यात अडकून पडल्याने स्वराज्याच्या चिंतेने राजे चिंताक्रांत झाले होते. ४ महिने होऊनसुद्धा गड हाती न आल्याने कसलेला सेनापती असूनसुद्धा जौहरचा उत्साह थोडाफार मावळलेला होता. आषाढ महिना होता. राजांनी गंगाधरपंत या आपल्या वकिलाला सिद्दीकडे तहाच्या बोलण्यासाठी पत्र घेऊन पाठवले. सिद्दी तहाच्या गोष्टीमुळे खूश झाला व तो वाटाघाटीस तयार झाला. राजांच्या मनात पन्हाळगडावरून निसटून विशाळगडावर जाण्याचे विचार येऊ लागले. वाटाघाटी चालू ठेवून गुप्तपणे त्यांनी तात्काळ निवडक मावळ्यांना घेऊन वेढ्यातून निसटण्याची तयारी सुरू केली.

बाजी सगळा विचार करून शिवावर जोखमेची कामगिरी सोपवतात व यामध्ये त्याचा जीव देखील प्रसंगी गमवावा लागेल असे सांगतात. त्यावर शिवा म्हणतो, ''जीव !

त्याची बढाई कशाला सांगता ? कवाबी मरायचं नव्हं ? पन जीव ओवाळून टाकावं, असं कुणीतरी भेटायला हवं !''[७३] त्यावर बाजी त्याच्याच नशिबात ते भाग्य असल्याचं सांगतात. राजे गडाबाहेर गेल्यानंतर जर सिद्दीला कळाले तर राजे बनून छावणीत जावे लागेल असेही सांगतात. शिवा म्हणतो, ''असली संधी कोन सोडंल ? आता बेत बदलू नका. ती जोखीम माझी.''[७४]

राजांनी आपल्या स्वराज्यात अशी माणसे तयार केली होती की जी कसलाही विचार न करता प्रसंगी राष्ट्रासाठी आपल्या स्वामीसाठी प्राणत्याग करतील. त्यामधीलच शिवा एक होता.

पन्हाळगड सोडल्यानंतर थोड्याच वेळात सिद्दीच्या सैनिकांना दगा झाल्याचे कळते. तोपर्यंत राजांची पालखी पुढे नेली जाते व शिवाची पालखी सिद्दीच्या तळाकडे जायला निघते. सिद्दीचे सैनिक शिवाच्या पालखीला गराडा घालतात व तो शिवाजीराजे आहेत असं समजून पालखी छावणीकडे नेतात.

छावणीत गेल्यानंतर थोड्याच वेळात शिवाचे सोंग उघडकीस येते. त्यामुळे फाजलचा संताप उफाळून येतो व तो शिवाला हरामखोर म्हणतो. त्यावर शिवा म्हणतो, ''हरामखोर मी नव्हे ! मी माझ्या धन्यासाठी इथं आलो. हरामखोर तू ! बाप मेला, तरी त्याच्याकडं पाठ वळवली नाहीस. मी तसा नाही सोंगातला का होईना, पण शिवाजी बनलो. बस्स ! जिवाचं सोनं झालं.''[७५]

त्याच्या या बोलण्याने फाजलने संतापाने तलवार शिवाच्या छाताडातून आरपार नेली. शिवाचं शरीर विजेसारखं कंप पावत होतं. छाताडात रूतलेल्या तलवारीच्या जखमेतून रक्त उसळत होतं. एक विराट हास्य त्याच्या मुखावर अवतरलं. फाजलकडं पाहत तो म्हणाला, ''फाजल ! सोंगातला शिवाजी झाला, म्हणून काय झालं ? तो कधी पालथा पडतो काय ? राजे ऽऽ येतो ऽऽ मुज....''[७६]

शत्रूच्या गोटात गेल्यानंतर सोंग उघडकीस आल्यानंतरही न घाबरता किंवा डळमळीत न होता प्रसंगावधान राखून शत्रूचा सामना करणारा शिवा या ठिकाणी दिसून येतो. राजापुढे जिवाचे मोल न बाळगणारा, दृढनिश्चयी, स्वराज्याचे मोल जाणणारा शिवा येथे आलेला आहे. त्याच्या या अनमोल अशा बलिदानामुळे तो आपल्या लक्षात राहतो.

### ४) **यशवंत जगदाळे :-**

यशवंत जगदाळे हा भोरच्या गुणाजी जगदाळ्यांचा मुलगा. प्रत्यक्ष बाजींशी पट्ट्याचे डाव खेळून तो धारकरी बनला. आत्मविश्वासपूर्ण बोलण्याने तो बाजींचे मन जिंकतो. राजांबरोबर तो सावलीसारखा उभा होता. त्याने केलेली वाघाची शिकार त्याच्या शौर्याची जाणीव आपल्याला करून देते. सिद्दीने इंग्रजांकडून मदत मागून दोन लांब पट्ट्याच्या तोफा आणल्याची बातमी सिद्दीच्या प्रत्यक्ष तळावर जाऊन यशवंतच आणतो. राजांच्या प्रत्यक्ष मोहिमेत तो भाग घेताना दिसतो. खेळण्यावर राजे सुर्वे आणि माळवणकरांचा मोर्चा उद्ध्वस्त करताना राजे त्याचा जीव वाचवितात.

अशारीतीने यशवंत पावनखिंडीत राजांबरोबर सतत असलेला दिसून येतो.

वरील महत्त्वाच्या व्यक्तिरेखांखेरीज इतर अनेक लहानमोठ्या व्यक्तिरेखा या कादंबरीत आहेत. बाजींच्या जीवाला जीव देणारा त्यांचा थोरला बंधू फुलाजी देशपांडे, हेरगिरी करून सर्व बातम्या राजांना कळविणारा बहिर्जी नाईक, महादेव सोंगाडी, विठोजी, तात्याबा म्हसकर, महाराजांच्या बरोबर असणारा आबाजी, विश्वनाथ, गुणाजी, सखू, सरनोबत, नेताजी पालकर, सय्यदखान, तुळसा, मानाजी नाईक, फाजलखान, शहाजीराजे, रूस्तुमजमा, बडी बेगम, गंगाधरपंत, सूर्याजी त्र्यंबक भास्कर इ. पात्रे या कादंबरीत येतात.

या व्यक्तिरेखा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात बाजींच्या भोवती गुंफलेल्या असल्यामुळे सारी पात्रे आपल्या लक्षात राहतात. त्यामुळेच ही कादंबरी उठावदार झाली आहे.

## २) 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीतील व्यक्तिरेखा :-

'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबरीमध्ये महत्त्वाच्या व्यक्तिरेखा ज्या रेखाटल्या आहेत त्या काही प्रमाणात एकसारख्याच आहेत. परंतु काही प्रमाणात त्यामध्ये बदलदेखील आहे. 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत आलेल्या महत्त्वाच्या व गौण व्यक्तिरेखा पुढीलप्रमाणे सांगता येतील -

### १) बाजीप्रभू देशपांडे :-

'इथेच पडला बांध खिंडीला बाजीप्रभूंच्या छातीचा,

इथेच फुटली छाती, परी दिमाख न हरला जातीचा.'

युगपुरूष, लोकहितदक्ष, महापराक्रमी छत्रपती शिवाजी महाराजांकडे नवरत्नांचा खजिना होता. या खजिन्यातील एक नवरत्न म्हणजे बाजीप्रभू देशपांडे. महाराष्ट्राच्या मातीत अनेक शूरवीर जन्माला आले. आपल्या पराक्रमाने महाराष्ट्राची शान राखली. छ. शिवाजी यांनी मोगलांविरूद्ध दिलेल्या लढ्यात त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी प्राणाची आहुती दिली. यात बाजीप्रभूंचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल.

'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत बाजीप्रभूंच्या जन्मापासून ते गजाखिंडीत त्यांनी प्राणत्याग करण्यापर्यंतचा भाग रेखाटलेला आहे. बाजींवर खऱ्या अर्थाने संस्कार घडविले ते त्यांचे आजोबा पिलाजीप्रभू यांनी. बाजींच्या बुद्धीचा, शौर्याचा दरारा सबंध मावळमध्ये होता. किल्ल्यांची जडणघडण हा बाजींचा आवडीचा विषय होता. विविध प्रकारची हत्यारे चालविण्यात बाजी तरबेज होते. त्याचप्रमाणे कुस्ती आणि पोहणे हा त्यांच्या आवडीचा छंद होता.

देशपांडे-बांदल यांच्यात जोरदार युद्ध झालं. या युद्धात बाजींचे आजोबा पिलाजीप्रभू आणि भाऊ अनाजीप्रभू कामी आले. या युद्धाचे परिणाम म्हणून बाजी बांदलांचे दिवाण म्हणून कारभार पाहू लागले. कृष्णाजी बांदलने रयतेवर चालवलेले अत्याचार राजांना

सहन झाले नाहीत. त्यामुळे राजांनी कृष्णाजी बांदलास ठार केले. या गोष्टीमुळे बाजी संतापले. त्यांच्या मनामध्ये राजांबद्दल एक अढी निर्माण झाली.

बाजींसारखे बलाढ्य व्यक्तिमत्त्व स्वराज्यात असावे असे राजांना वाटत होते. त्यामुळे राजे बाजींना भेटण्यासाठी त्यांच्या गावी जातात. बाजींची भव्य मूर्ती आणि पहाडी व्यक्तिमत्त्व पाहून राजांना बाजींच्या व्यक्तिमत्त्वात भगवान शंकराच्या रूद्ररूपाचा भास झाला. बाजींच्या मनामध्ये अजूनही राजांविषयी संताप होता. परंतु राजांनी कृष्णाजी बांदलने रयतेवर केलेल्या अत्याचाराची जाणीव त्यांना करून दिली. त्यांच्या बोलण्याने बाजी भावनाशील झाले. त्यांची मुद्रा करारी बनली. बाजी एकदम आत्मविश्वासाने बोलले, ''खऱ्या अर्थाने देव, देश आणि धर्म यांचे जागरण करणाऱ्या शिवप्रभूंच्या पाठीशी आम्ही सदैव उभे राहू. आता आमचे जीवन आणि मरण श्रींच्या इच्छेने शिवाजीराजांच्या पायाशी असेल. आम्हा देशपांडेप्रभूंच्या कुलस्वामिनीच्या साक्षीने, आदिशक्ती मळाईमातेच्या शपथेने सांगतो, आबाजी ! आजपासून आम्ही आमच्या निष्ठा राजांच्या पायी वाहिल्यात.''[७७]

बाजींच्या या आत्मविश्वासपूर्ण बोलण्यातून त्यांचे रयतेवर असणारे प्रेम आणि शिवाजी राजांच्याविषयी वाटणारा आदर स्पष्ट होतो. यानंतर बाजी पायदाळाचे प्रमुख म्हणून काम पाहू लागतात. स्वराज्यावर अफजलखानाचे संकट येते त्यावेळेस बाजींच्या सहकार्याने राजे ते संकट परतवून लावतात.

पन्हाळगडावर राजे गेल्यानंतर सिद्दी जौहरचा पन्हाळ्याला वेढा बसतो. त्यावेळेस देखील बाजी राजांसोबत सावलीसारखे असतात. एक दिवस पन्हाळ्यावर असताना राजे बाजींसोबत किल्ल्यामध्येच असणाऱ्या बिनखांबी महादेवाच्या मंदिरात जातात. त्यावेळी बालेकिल्ल्यातील तो बिनखांबी मंदिरातला महादेव आणि त्याच्या पिंडीवरचा रंग बदलणारा शाळीग्राम बाजींना खुणावतोय. बाजी, रूद्राचं सामर्थ्य तुमच्यात आहे, रूद्रशक्ती तुमच्यात आहे, तुम्ही असताना राजांना वेढ्यातून बाहेर काढणे काय अशक्य आहे ? असा जणू मंदिरातून आवाज येतो आहे असे बाजींना वाटले.

पावसाळा सुरू होऊनदेखील सिद्दीचा वेढा उठला नव्हता. त्यामुळे राजे पन्हाळ्यावरून विशाळगडाकडे जाण्याचा निर्णय घेतात. सिद्दीकडे गंगाधरपंताकरवी शरणागतीचे पत्र पाठवितात. राजांच्या शरणागतीच्या पत्रामुळे सिद्दीला आनंद होतो आणि त्यामुळे वेढा ढिला पडतो. याचाच फायदा घेऊन चैत्र शुद्ध प्रतिपदेला पन्हाळ्यावर आलेले राजे आषाढी पौर्णिमेला गडाच्या बाहेर पडतात.

जेमतेम सहाशे मावळे आणि दोन पालख्या एवढेच लोक होते. थोडे अंतर गेल्यानंतर सिद्दीच्या लोकांना दगा झाल्याचे कळते. बाजींना ही गोष्ट समजताच शिवाची पालखी सिद्दीच्या छावणीकडे पाठवितात आणि राजांची पालखी घेऊन विशाळगडाकडे जाण्यास निघतात. शत्रू जवळ आल्याचे कळताच गजाखिंडीजवळ पालखी थांबते. बाजी राजांना विशाळगडाकडे जाण्यास सांगतात. परंतु राजे तयार होत नाहीत. त्यावर घडणाऱ्या प्रसंगाची जाणीव ठेवून बाजी राजांना वडीलकीच्या नात्याने रागावतात व आज्ञा देतात, ''राजे ! भवानीची शपथ आहे ! यावेळी आम्ही तुमचे काहीएक ऐकणार नाही. तुम्ही आधी पालखीत बसा अन् पुढे चालू लागा.''[७८]

राजे भावनाविवश होतात आणि बाजींना अलिंगन देतात. पाणावलेल्या डोळ्यांनी बाजी उद्गारतात, ''महाराज, आपण विशाळगडावर पोहोचल्याशिवाय आम्ही खिंड सोडत नाही. शत्रूला तसूभरसुद्धा पुढे सरकू देणार नाही. आपण सुखरूप पोहोचल्याचा फक्त इशारा करा. भांडी वाजवा. मग आम्हांला समाधान वाटेल.''[७९] यावरून बाजींची स्वामीनिष्ठा आणि देशासाठी प्राण देण्याची तयारी दिसून येते.

खिंडीमध्ये बाजी महारूद्राच्या साक्षात्कारी रूपात लढत होते तर बांदलांचा प्रत्येक माणूस कालभैरवाच्या रूपात रणचंडिकेच्या स्थंडिलावर नाचत होता. खिंड अत्यंत अवघड होती. एकावेळी एक-दोनच माणसे चढून येऊ शकतील अशी चिंचोळी जागा होती. त्यामुळे शत्रूची कोंडी झाली होती. बाजी-फुलाजींच्या अंगावर असंख्य जखमा झाल्या होत्या.

तरीही ते मागे हटावयास तयार नव्हते. बाजी मनानं राजांच्या भोवती होते पण शरीरानं मात्र पराक्रमाचा देदीप्यमान इतिहास स्वतःच्या रक्ताने या गजापूरच्या खिंडीत तलवारीने, पट्ट्याने लिहित होते.

बाजींना असंख्य जखमा झाल्या होत्या. त्यामुळे मावळे त्यांना विश्रांती घेण्यास सांगत होते. पण ते म्हणाले, ''नाही, नाही माझ्या शूरवीरांनो, महाराजांना आम्ही शब्द दिला आहे. विशाळगडावर पोहोचल्यावर तोफांना बत्ती देऊन इशारा झाल्याशिवाय आम्ही खिंड सोडणार नाही. तोफांचे आवाज ऐकल्याशिवाय आम्ही खिंडीतून एकही माणूस वर येऊ देणार नाही. अद्याप राजे विशाळगडावर पोहोचले नाहीत. तोफांचे आवाज अजून ऐकू येत नाहीत, तोपर्यंत हा बाजी मागे कसा हटेल ?''[८०] ध्येयपूर्तीसाठी मरणाची तमा न बाळगता अखेरच्या श्वासापर्यंत लढण्याची जिद्द असलेले बाजी या ठिकाणी दिसून येतात.

सिद्दी मसूदचा माणूस बाजींवर गोळी झाडतो आणि बाजी कोसळतात. तरीही त्यांचे कान अजूनही तोफेचा आवाज ऐकण्यास आतूर झालेले असतात आणि तोफांचे आवाज होतात. तेव्हा बाजींना आनंद होतो. ''राजे, आम्ही आपल्या मुजऱ्याला विशाळगडावर येऊ शकत नाही. राजे मुजरा, मुजरा, त्रिवार मुजरा. राजे, आम्ही आमचा शब्द पाळला. आता सुखाने, समाधानाने डोळे मिटतो. माझ्या शूरवीर मावळ्यांनो, तुम्हालाही मुजरा.''[८१]

अशारीतीने बाजी मरणाच्या दारात असतानाही राजांना मुजरा करायला विसरत नाहीत. शेवटचा मुजरा करून बाजी आपले प्राण सोडतात. 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत लेखक अरविंद दाढे यांनी मर्मस्पर्शी अशी बाजींची व्यक्तिरेखा रेखाटली आहे. त्यामुळेच बाजी आपल्या लक्षात राहतात.

### २) शिवाजीराजे :-

''शिवछत्रपती महाराष्ट्र धर्माचे मूलमंत्र आहेत. हिंदुस्थानच्या इतिहासात शिवरायांनी केलेल्या कार्याची महती आणि त्यांच्या अलौकिक गुणांची थोरवी प्रत्येकाने

जाणून घेतली पाहिजे. हिंदवी स्वराज्याची व्यापक कल्पना आणि त्या ध्येय सिद्धीसाठी परक्या, जुलमी सत्तांशी अखंड झुंज हे त्यांचे जीवनकार्य होते. त्यांचे अलौकिक ध्येय, देदीप्यमान कर्तृत्व व असामान्य व्यक्तिमत्त्व यामुळे महाराष्ट्राचा आणि देशाचा इतिहास उजळला. अस्मिता आणि स्वातंत्र्याची प्रेरणा या अनमोल तत्त्वांचा वारसा शिवछत्रपतींनी आपणास दिला.''[८२]

'पावनखिंड' या कादंबरी प्रमाणेच 'महारूद्र बाजीप्रभू' याही कादंबरीचे शिवाजी राजे नायक नाहीत. परंतु या कादंबरीत बाजीप्रभू देशपांडे यांच्या बरोबरीने त्यांना प्राधान्य दिलेले जाणवते. या कादंबरीमध्ये ज्या घटना घडल्या त्यामध्ये राजे सगळीकडे पार्श्वभूमीसारखे आहेत. 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत त्यांचे प्रथम दर्शन ज्यावेळी देशपांडे-बांदल यांच्यात युद्ध होते आणि त्याचे पडसाद म्हणून बाजीप्रभूंना बांदलांचे दिवाण म्हणून कारभार पाहावा लागतो त्यावेळेस होते.

राजांना बाजींसारखे रूद्रपराक्रमी रत्न आपल्या जामदारखान्यात यावे असे वाटत होते. त्यामुळेच ते बाजींना भेटण्याचा निर्णय घेतात. आपला विचार जिजाऊंना बोलून दाखवतात ते म्हणतात - ''आईसाहेब, आपलीच माणसे मोडावीत असं आम्हाला मुळीच वाटत नाही. काही झाले तरी बांदलांची माणसे आमचीच आहेत ही आमची भावना कायम आहे. माणसं मोडण्यापेक्षा जोडण्याकडे आमचा कल आहे.''[८३]

यावरून राजांची गुणग्राहकता, मुत्सद्देगिरी आणि दूरदृष्टी त्याचप्रमाणे रयतेविषयी त्यांच्या मनातील जिव्हाळा या ठिकाणी दिसून येतो. राजे ज्यावेळी बाजींना भेटण्यास त्यांच्या शिंद या गावी जातात त्यावेळी देखील योग्य शब्दांमध्ये कृष्णाजी बांदलने रयतेवर केलेल्या अत्याचाराची जाणीव करून देतात. ते म्हणतात, ''बाजी, खरं सांगा. वतनाच्या झुंजींनी सामान्य माणूस होरपळून गेलाय. गोरगरिबांना कोणी वाली आहे काय ? बाजी ! कृष्णाजी बांदल न्यायाने कारभार करत होते काय ? अनेक गोरगरीब रयतेच्या पशा-

दोन पशातले धान्य ओरबडून घ्यायचे. गोरगरिबांच्या दावणीला गुरं राहात होती काय ? अशा कित्येक तक्रारी आमच्यापर्यंत आल्यात. आज नाही उद्या बांदल बदलतील म्हणून आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. कृष्णाजी बांदलांनी गुंजण मावळात घुसायला सुरूवात केली. तेव्हा त्यात लक्ष घालणे आम्हांला भाग पडले.''[८४]

त्यांच्या या बोलण्याने बाजी भावनाशील होतात आणि राजांच्या पायी निष्ठा वाहिल्याची शपथ घेतात. बाजीप्रभू स्वराज्यात आल्यामुळे जणू काही शिवशंकरांची महारूद्र शक्ती राजांना प्राप्त झाली होती. जिजाऊंना घडलेली हकिकत सांगून राजकारणातील एक डाव यशस्वीपणे जिंकल्याचे राजे सांगतात आणि म्हणतात, ''........ उद्याच्या अडचणीच्या काळात आणि उद्याच्या रणसंग्रामात जेधे-बांदलांच्या समशेरी तेजाने तळपतील. त्यांच्या पराक्रमाने इतिहासाची पाने सुवर्णाच्या अक्षरांनी लिहिली जातील.''[८५]

यानंतरचा बराचसा 'पावनखिंडी' तील भाग यात आलेला दिसतो. परंतु यामध्ये त्याविषयी सविस्तर वर्णन आलेले दिसते. पन्हाळगडाला सिद्दी जौहरचा वेढा पडतो. पावसाळ्यातही तो वेढा न उठवता पावसाळी छावणी तयार करतो. त्यामुळे राजे चिंतातूर होतात. परंतु विचारपूर्वक शत्रूचा सामना करण्याचे ठरवतात. त्यांना देवीचा साक्षात्कार होतो. साक्षात्कारी चैतन्याने भारावलेल्या अवस्थेतच ते शिवाला पाहतात. आपलीच उत्कट प्रतिमा आपण शिवा काशिदच्या रूपानं पाहत आहोत, असं राजांना जाणवते. राजे आषाढी पौर्णिमेला गड सोडण्याचे निश्चित करतात. गंगाधरपंतांकरवी सिद्दीला शरणागतीचे पत्र देऊन गडाबाहेर जाण्याची तयारी करतात.

आपल्यासाठी शिवा काशिद शिवाजी बनून जाणार या कल्पनेने राजे उदास होतात. आपल्या गळ्यातील कवड्याची माळ त्याच्या गळ्यात घालतात आणि म्हणतात, ''शिवा, हा जगदंबेचा पोत आहे. आमच्या श्रद्धेचा, भावभक्तीचा हा पोत आम्ही तुझ्या गळ्यात घालत आहोत. या पोतावरून शिवाजी ओळखला जातो. माझ्या गळ्यातील हा पोत साऱ्या शत्रूंना माहीत आहे. त्या जगदंबेच्या पोताला कमीपणा येईल असा वागू नको.''[८६]

शिवाजी राजांसाठी आनंदाने प्राण देणारी माणसे होती. त्यांची राजांवर निस्सीम श्रद्धा व भक्ती होती. आषाढी पौर्णिमेच्या रात्री दोन पालख्यांतून राजे व शिवा आणि पाच-सहाशे धारकरी सोबत घेऊन बाजी गडाबाहेर पडतात. परंतु थोड्याच वेळात शत्रूला खबर कळते. त्यामुळे शिवाची पालखी शत्रूच्या गोटाकडे वळवली जाते आणि राजांची पालखी विशाळगडाकडे जाण्यास निघते. गजाखिंडीत गेल्यानंतर शत्रू जवळ आल्याचे कळते. तेव्हा बाजी प्रसंग लक्षात घेऊन राजांना आज्ञा करतात आणि पुढे जाण्यास सांगतात. परंतु राजे म्हणतात, ''नाही बाजी, तुम्हांला मरणाच्या तोंडी सोडून आम्हांला पुढे जाण्याची इच्छा नाही. आम्हीसुद्धा तुमच्या खांद्याला खांदा देऊन शत्रूशी झुंजू.''[८७] शेवटी बाजींपुढे त्यांचे काहीएक चालत नाही आणि ते विशाळगडाकडे जातात.

राजे विशाळगडावर पोहोचतात. पण त्यांचे सारे लक्ष गजाखिंडीत लागलेले असते. तोफेची खूण केली जाते. बाजींना आणावयास पालखी पाठवली जाते. बाजींचे प्रेत पाहून त्यांच्या भावना अनावर होतात. भावनेपुढे कर्तव्य श्रेष्ठ ठरते. जीवाभावाच्या साथीदारांना धीर देणं आज राजाचं प्रथम कर्तव्य होतं. ते म्हणतात, ''महारूद्र मृत्युंजय बाजीप्रभू आणि फुलाजीप्रभू यांना इतमामानं अमृतेश्वराच्या मंदिरासमोर अग्नी देण्याची व्यवस्था करावी.''[८८]

बाजी-फुलाजींच्या प्रेताला अग्नी दिल्यानंतर मात्र राजांना आपल्या भावनांना आवर घालणे कठीण झाले. ते म्हणाले, ''बाजी, काय केलंत हे ? राजे तुम्ही पुढे व्हा, आम्ही मागावून गडावर दर्शनाला येतो असं म्हणाला होतात ना ! मग बाजी असल्या का दर्शनाला यायचं होतं गडावर ?''[८९]

त्यांच्या या बोलण्यावरून बाजींविषयी त्यांना वाटणारे अतीव प्रेम दिसून येते. बाजी-फुलाजींच्या घरी त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी राजे जातात. त्यावेळी ते म्हणतात, ''गौतमाई आणि सोनाईंना काही सांगायला आमच्यापाशी शब्दच नाहीत. तरी पण त्यांनी आमच्यापाशी काहीही मागावं. त्या मागतील ते देण्याची आमची तयारी आहे. कोरडं सांत्वन करून आम्हाला चालणार नाही.....''[९०]

राजे त्यांना विनंती करतात तेव्हा बाजींच्या पत्नी गौतमाई शस्त्रागारातून समशेर आणून राजांच्या हाती देतात आणि बाजींचा मुलगा महादजी याच्या कमरेला बांधण्यास सांगतात व अडचणीच्या वेळी देशपांडप्रभूंना रक्त सांडण्याची संधी द्यावी अशी विनंती करतात.

ही कादंबरी वाचत असताना 'धैर्याचा मेरूमणी' अशी राजांची प्रतिमा आपल्यासमोर उभी राहते. महाराजांचे धैर्य, क्षमाशीलता, माणसाची पारख व स्वराज्यासाठी केलेले प्रयत्न यांची अनुभूती आपणास येते व आपले मस्तक राजांपुढे आपोआप आदराने झुकते.

**३) शिवा काशिद :-**

'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत शिवा काशिद याचे वर्णन थोडक्यात आले आहे. परंतु त्याने केलेली कामगिरी या ठिकाणी अतिशय मोलाची आहे. शिवाजीराजांच्या स्वराज्यसाधनेच्या कार्यामध्ये त्याने दिलेले सहकार्य व बलिदान अतिशय महत्त्वाचे आहे.

या कादंबरीत त्याची भेट राजे ज्यावेळेस पन्हाळगडावर जाण्यास निघतात त्यावेळी होते. शिवा पन्हाळ्याच्या पायथ्याशी असणाऱ्या नेवापूर गावचा. तो दिसायला अगदी राजांसारखाच होता. त्याची राजांच्या प्रती असणारी निष्ठा आणि प्रेम जाज्वल्य स्वरूपाचं होतं.

एकदा राजे त्याला या शिवाजीसाठी तुला मरायला सांगितले तर काय करशील असे विचारतात. त्यावर तो आत्मविश्वासाने म्हणतो, ''महाराज, भवानीची शपथ आहे. आता शब्द माघारी घेऊ नका. कसा आणि कुठं मरू एवढंच सांगा. माझ्यासारख्या हजारो शिवा काशिदचे प्रपंच सावरणारा अनेकांचा पोशिंदा वाचला पाहिजे !''[११] या वाक्यावरून शिवाची स्वामीनिष्ठा आणि त्याची राजांवरील निस्सीम भक्ती याचे दर्शन होते. त्याची जीवाची पर्वा न करता स्वराज्यासाठी प्राणार्पण करण्याची वृत्ती आपणास अधिक अंतर्मुख करते.

शिवा बाजींना, सिद्दीच्या शामियान्यात माझं काही बरवाईट झालं तर राजांना व्यवस्थित पोहचविण्याचे वचन देण्यास सांगतो. ''बाजी, मला शब्द द्या, मला वचन द्या की राजाला कोणत्याही परिस्थितीत बिनधोक विशाळगडावर पावता करीन म्हणून.''[१२]

शिवाजी राजांच्या जामदारखान्यात असणारी प्रत्येक व्यक्ती देव, देश आणि धर्मासाठी प्राणाची आहुती कोणत्याही क्षणी देणारी होती. आषाढी पौर्णिमेला गडाबाहेर जाण्याचे ठरते. त्यावेळी राजे आपल्या गळ्यातील कवड्याची माळ त्याच्या गळ्यात घालतात. त्यावेळी तो म्हणतो, ''मी एक सामान्य न्हावी, पण औटघटकेचा का होईना 'शिवाजी राजा' झालो. आता अगदी आनंदानं धैर्यानं राजाच्या मरणानं मरेन. माझ्या जन्माचं सार्थक झालं !''[१३]

ठरलेल्या वेळी पाच-सहाशे धारकऱ्यांबरोबर दोन पालखीतून शिवा आणि राजे बाजींबरोबर गडाबाहेर पडून विशाळगडाकडे जाण्यास निघतात. परंतु शत्रूला थोड्याच वेळात विशाळगडाकडे जाणारा हा जत्था दिसतो. बाजींच्या लक्षात ही गोष्ट येते. तेव्हा ते शिवाची पालखी सिद्दीच्या सैनिकांच्या दिशेने पाठवतात. येथपर्यंतचाच भाग या कादंबरीत येतो.

या कादंबरीत इतर व्यक्तिरेखांवर जास्त भर देण्यापेक्षा बाजींवर लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते. त्यामुळे शिवाचे पुढे काय झाले असेल हे वाचकांच्या लक्षात आल्यावाचून राहत नाही. शत्रूच्या गोटात जाऊन थोड्या वेळाने त्याचे सोंग उघडे पडणार हे निश्चित आणि स्वामीनिष्ठा, राष्ट्रनिष्ठेपायी शिवाचे बलिदान हा भाग आपोआपच लक्षात येतो.

### ४) फुलाजीप्रभू देशपांडे :-

फुलाजीप्रभू देशपांडे हे बाजीप्रभूंचे थोरले बंधू शिवाजी राजांच्या जामदारखान्यातील अनमोल रत्नांपैकी एक रत्न. 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत फुलाजी शेवटपर्यंत बाजींच्या सोबत वावरताना दिसून येतात. बाजींबरोबर खिंड लढवून त्यांनी प्राणांचे बलिदान देऊन आपली स्वामीनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा दाखवून दिली.

पन्हाळ्याला सिद्दीचा वेढा पडल्यानंतर फुलाजी राजांसोबत सावलीसारखे उभे होते. गडाबाहेर पडण्याचे निश्चित झाल्यानंतर फुलाजी-बाजींसह पाच-सहाशे धारकरी त्यांच्यासोबत होते. खिंडीपर्यंत आल्यानंतर राजे विशाळगडाकडे जातात आणि बाजी-फुलाजी शत्रूचा सामना करण्यासाठी खिंडीत थांबतात. खिंड अत्यंत अवघड होती. एकावेळी एक-दोनच माणसे चढून वर येऊ शकतील अशी चिंचोळी जागा होती. त्यामुळे शत्रूची कोंडी झाली होती. फुलाजीप्रभू म्हणजे देशपांडे घराण्याच्या परंपरेची मौल्यवान पण दुधारी तलवार होती. फुलाजी आपले देहभान विसरूनच लढत होते.

शत्रूशी लढत असताना फुलाजींच्या अंगावर असंख्य जखमा झाल्या होत्या. अंगातून गळणाऱ्या रक्तात वरच्या पावसाचं पाणी पडत होतं आणि ते लालेलाल झालेले पाणी सबंध खिंडीत पसरून त्या गजाखिंडीत मुरत होतं. तिथल्या मातीच्या कणाकणात मुरत होतं, त्यागाचं, स्वामीनिष्ठेचं, हिंदुत्वासाठी केलेल्या बलिदानाचं बीज त्या खिंडीत पेरलं जात होतं. फुलाजींची शक्ती क्षीण होत चालली होती. डोळ्यांपुढे अंधारी येत होती. तरीही आंतरिक दुर्दम्य इच्छाशक्ती फुलाजींना मागे हटू देत नव्हती. ते तोल सावरत ठामपणे लढतच होते.

बाजी फुलाजींना विश्रांती घेण्यास पुन्हा पुन्हा सांगत होते. पण ते म्हणाले, ''नाही, नाही बाजी. आम्ही मोठे आहोत. आम्ही पुढेच असायला हवे. तुम्ही लहान आहात. तुम्ही मागे हटा. विश्रांती घ्या.''[१४]

मृत्यू समोर दिसत असतानादेखील ध्येयपूर्तीसाठी मरणाची चढाओढ लावणारी माणसे या ठिकाणी दिसून येतात. ''बाजी, आम्हाला उभं राहावत नाही. तरी आम्ही शेवटच्या क्षणापर्यंत स्वामीकार्यावर अढळ राहणार.''[१५]

स्वामीनिष्ठा, राष्ट्रनिष्ठेसाठी मरणाकडे तुच्छतेने पाहणारे फुलाजी येथे दिसून येतात. त्यांच्या अंगातील सारं रक्त संपलं होतं. त्यामुळे ते एकदम कोसळतात आणि बाजीला मुजरा करून डोळे मिटतात.

अशारीतीने या कादंबरीमध्ये आलेली फुलाजींची व्यक्तिरेखा लेखकाने अतिशय तळमळीने रेखाटलेली आहे.

**५) बाजीप्रभूंच्या आई - बयोबाई देशपांडे :-**

'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीमधील ही आणखी एक महत्त्वपूर्ण अशी व्यक्तिरेखा. यांच्यामुळेच बाजीप्रभूंचे व्यक्तिमत्त्व खऱ्या अर्थाने घडले. त्यामुळेच त्यांची व्यक्तिरेखा या ठिकाणी जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

बयोबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन अतिशय मोजक्या पण प्रभावी शब्दांमध्ये लेखकाने केले आहे. कृष्णाजीप्रभूंची पत्नी बयोबाई या अत्यंत देखण्या होत्या. केतकीसारखा गोरापान रंग, चाफेकळी नाक, मोहक चेहरा, आकर्षक आणि लाघवी व्यक्तिमत्त्व, त्यांच्या नजरेत एक विलक्षण सामर्थ्य होतं. त्यांच्या नजरेत एक करारीपणा आणि त्यांच्या ठायी असणारा आत्मविश्वास सहज जाणवणारा होता. त्या अतिशय चतुर, चाणाक्ष आणि बुद्धिमान होत्या.

बयोबाई आणि कृष्णाजीप्रभू यांना तीन पुत्र होते. चौथ्या वेळी त्यांना दिवस गेले होते. त्या नेहमी भगवान शिवशंभू, शंकराचं - महारूद्राचं स्मरण करत असत. तासन्तास महादेवाच्या पिंडीसमोर बसून प्रार्थना करत. कदाचित 'रूद्रपराक्रमी पुत्र दे' असं मागणं मागत असाव्यात. त्यांची कुलस्वामिनी असलेल्या मळाई मातेच्या दर्शनाला गेले असता कृष्णाजीप्रभू देवीजवळ काय मागितले म्हणून विचारतात. त्यावर त्या आत्मविश्वासाने म्हणतात, ''आम्ही देवीजवळ, रूद्रपराक्रमी पुत्र मागितला, महारूद्राचा साक्षात्कारी पुत्र मागितला.''[१६] या वाक्यावरून त्यांना आपल्याला मुलगाच होणार याविषयी असणारा प्रचंड आत्मविश्वास दिसून येतो.

डोहाळजेवणाच्या कार्यक्रमावेळी त्यांच्या हातात फुलांनी सजवलेलं धनुष्य दिलं असता त्या म्हणाल्या, ''फुलांच्या धनुष्यबाणांनी शरसंधान नाही करावसं वाटत आम्हांला. आम्हाला भगवान महादेवाचं त्रिशूळ, डमरू हातात घ्यावंसं वाटतंय.''[१७]

यावरून निसर्गाने घडविलेल्या गोष्टींचा परिणाम नकळतपणे त्या गोष्टींवर पडत असलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे बाजी आपल्या आईच्या पोटात असतानाच आपल्या आईकडून पुढील भविष्यात उपयोगी पडणाऱ्या अनेक गोष्टी नकळतपणे शिकत असावेत असे याठिकाणी वाटते.

बयोबाई यांना मुलगा होतो आणि तोच मुलगा म्हणजे बाजीप्रभू. त्यानंतर बाळाच्या पाचवीचा आणि बारशाच्या कार्यक्रमाचे वर्णन येते. त्यांनतर बाजी, फुलाजी ज्यावेळेस पन्हाळगडावर राजांसोबत असतात. त्यावेळी घरच्या लोकांना आधार देण्याचे काम त्या अतिशय चांगल्या रीतीने करतात. त्या म्हणतात, "अहो, राजांच्यावर कसलंही भयानक संकट आलं तरी सुद्धा आमचे देशपांड्यांचे बलराम-कृष्ण राजांच्या समवेत आहेत. राजांना भयंकर संकटातून आणि अडचणीतून ते बाहेर काढल्याशिवाय राहणार नाहीत."[१८] यावरून आपल्या मुलांविषयी त्यांना वाटणारा दुर्दम्य आत्मविश्वास येथे दिसून येतो.

पन्हाळगडावरची कोणतीच बातमी मावळात पोहचली नव्हती. त्यामुळे साऱ्यांच्या मनात चिंता आणि काळजी दाटली होती. त्या सर्वांना धीर देत होत्या. पण त्यांचं मन राजे, फुलाजी आणि बाजी यांच्या काळजीने ग्रासलं होतं.

सर्वांना शेवटी बाजी-फुलाजींच्या प्रखर पराक्रमाची गाथा समजते. बयोबाई तर दु:खाने खचल्या पण राजांसाठी त्यांच्या मुलांनी केलेल्या बलिदानाने त्यांचा ऊर भरून आला. राजे आणि जिजाऊमाता बाजींच्या घरी त्यांच्या घरातील व्यक्तींचे सांत्वन करण्यासाठी गेले असता बयोबाई सारे गंभीरपणे पाहत होत्या. ना खंत, ना खेद, ना दु:ख या भावनांच्या पलीकडे त्या पोहोचल्या होत्या. निष्काम कर्मयोग्याप्रमाणे त्यांची अवस्था झाली होती.

या कादंबरीत बयोबाईंचे वर्णन इथपर्यंत आले आहे. पण इथपर्यंतची असणारी त्यांची व्यक्तिरेखा आपल्या मनात एक वेगळेच स्थान निर्माण करते. प्रचंड आत्मविश्वास आणि प्रसंगी देशासाठी राजांसाठी आपल्या मुलांना लढण्यास लावणारी त्यांची मूर्ती लेखकाने मूर्तिमंत उभी केली आहे.

### ६) गौण व्यक्तिरेखा :-

'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत वरील व्यक्तिरेखांशिवाय अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्या सतत बाजीबरोबर वावरत असल्यामुळे लक्षात राहतात. त्यामध्ये पिलाजीप्रभू, शहाजीराजे, कृष्णाजीप्रभू, बाजीप्रभूंच्या पत्नी - सोनाई-गौतमाई, कृष्णाजी बांदल, बाजी बांदल, जिजाऊमाता, दादोजी कोंडदेव, रघुनाथपंत, आबाजी, कान्होजी, येसाजी कंक, कान्होजी नाईक, मोरोपंत पिंगळे, बडी बेगम, अदिलशहा, सिद्दी जौहर, सिद्दी मसूद अशा अनेक व्यक्तिरेखा यामध्ये आलेल्या आहेत. या व्यक्तिरेखांमुळे कादंबरी उठावदार झालेली आहे आणि या व्यक्तिरेखा आणि त्यांच्या संवादामुळे त्यावेळची राजकीय, सामाजिक परिस्थिती आपल्यापुढे साकार करण्याचे काम ही कादंबरी करते.

## ४) कादंबरीतील ऐतिहासिक व सामाजिक वातावरण :-

'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्या म्हणजे बाजीप्रभूंच्या गजापूरच्या खिंडीतील मराठी स्वराज्याच्या बलिदानासाठी केलेल्या त्यागाची आणि बलिदानाची कहाणी होय. दोन्ही कादंबऱ्यांतील समाजजीवन हे १६ व्या शतकातील प्रातिनिधीक समाजजीवन होय. रणजित देसाई आणि अरविंद दाढे यांनी हे समाजजीवन यथार्थपणे चित्रित केलेले जाणवते. तत्कालिन ऐतिहासिक प्रसंग व तेव्हाची शब्दकला या अतिशय यशस्वीपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

''महाराष्ट्रात अहमदनगरची निजामशाही (इ.स. १४९० ते १६३६) व विजापूरची अदिलशाही (इ.स. १४८९ ते १६८६) यांचा अंमल होता. त्यांना स्थानिक अधिकाऱ्यांची मदत घ्यावी लागत असे. यात भोसले, जाधव, निंबाळकर, घोरपडे, मोरे इ. सरदार सुलतानांच्या लष्करात मोठ्या पदावर होते. सुलतानांच्या आपापसातील संघर्षाचा फायदा 'मालोजी' व 'शहाजी' यांनी करून घेतला. या वारशांच्या आधारे शिवाजी महाराजांना स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवण्यास वाव मिळाला.'' [११]

'पावनखिंड' या कादंबरीत असलेला तात्याबा म्हसकर जी तक्रार करतो ती त्यावेळच्या समाजजीवनाचे द्योतकच आहे. त्या काळी स्वत:च्या कर्तबगारीवर व्यक्तीला शिलेदारीत प्रवेश मिळत असे. यशवंताने सुद्धा साक्षात बाजींशी छोटीशी स्पर्धा करून शिलेदारीत आपली जागा पक्की केली होती.

''दक्षिण महाराष्ट्रातील पन्हाळगड हा महत्त्वपूर्ण किल्ला शिवाजी महाराजांना ताब्यात ठेवणे आवश्यक होते. कारण पन्हाळगडावरून दक्षिणेकडे जिंजी-तंजावरपर्यंतचा आणि उत्तरेकडे बागलाण-बुऱ्हाणपुरापर्यंतचा प्रदेश तसेच पूर्वेला विजापूर, गोवळकोंडा आणि पश्चिमेला कोकणचा किनारा यावर नियंत्रण ठेवता येत होते.''[१००] बळकट किल्ले हे आपले वैभव व सामर्थ्य आहे हे सर्वप्रथम शिवाजीराजांनी ओळखले आणि त्यातूनच बारा मावळातील गडांचा बंदोबस्त केला. पन्हाळगडचा ताबा मिळवण्यापूर्वी विजापूरकरांनी 'रूस्तमजमा' हा सरदार कोल्हापूरच्या सुभ्यावरती नेमलेला होता. ''त्याच्याच अंमलाखाली पन्हाळा किल्ला होता. हा प्रदेश डोंगराळ असल्याने या प्रदेशावर बंदोबस्त ठेवण्यास हिंदू कामगारांचा विशेष उपयोग होत असे.''[१०१] पण हीच गोष्ट शिवाजी महाराजांना पन्हाळगड घेण्यास अनुकूल ठरली. ''त्यांनी पन्हाळ्याच्या किल्लेदारांशी आतून संधान बांधले व अण्णाजी दत्तो यांच्यामार्फत पन्हाळगडचा ताबा मिळविला.''[१०२]

'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये गुढीपाडव्याचे वर्णन आले आहे. वर्षातले सारे सण त्या काळातदेखील मोठ्या प्रमाणावर साजरे होत असत. गुढीपाडव्याला सोंगे काढली जात असत. यामुळेच 'शिवा न्हावी' हा शिवाजीराजांसारखाच दिसणारा मुलगा राजांना मिळतो हे 'पावनखिंड' मध्ये पाहावयास मिळते. राजांचे गुप्तहेर खाते सर्वच बाबींवर नजर ठेवून होते. बहिर्जी नाईक, महादेव सोंगाडी हे नजरबाज समाजात कोणत्या ना कोणत्या रूपाने वावरून सर्व माहिती काढून राजांना पाठवीत असत. परमेश्वरी संकल्पना समाजात मोठ्या प्रमाणावर त्याकाळी रूढ होती. प्रत्यक्ष

परमेश्वराची भक्ती केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आपल्याला यश लाभते ही विचारसरणी रूढ होती.

राजांना भवानीदेवी प्रसन्न होती हा समजदेखील समाजात रूढ होता. 'पावनखिंड' या कादंबरीमध्ये जासलोड गडाच्या बांधणीचे काम चालू असताना वेताळाचा बुरूज म्हणून असलेल्या बुरूजाजवळ जाण्यास कोणीही तयार होत नाही हा भाग आलेला आहे. त्या बुरूजाकडे जाण्यास कोणीदेखील का तयार होत नाहीत याचा राजे खुलासा करून घेतात व त्यानुसार आपणाला जगदंबा प्रसन्न आहे असे सांगतात. त्यांच्या बोलण्यावर सर्वजण विश्वास ठेवतात व शेवटी वेताळाचा बुरूज खणण्यास तयार होतात.

बाजी राजांना खरंच दृष्टांत झाला होता का म्हणून विचारतात त्यावेळेस राजे म्हणतात, ''दृष्टांत वगैरे काही झाला नव्हता. ही दृष्टी आम्हांला दादोजींनी दिली. चाणक्य काळापासून राजनीतीत ही गोष्ट आहे. गडाचा खजिना जेव्हा सुरक्षित राखायचा असतो, तेव्हा हीच पद्धत अवलंबली जाते.''[१०३]

मावळातील त्रेपन्न गावचा कारभार देशपांडे घराणे पाहत होते. त्यांना हे वतन बिदरच्या मिर्झा अलिबेरीद शहाने बहाल केले होते. या देशपांडेप्रभूंचे रयतेवर जिवापाड प्रेम होते. त्या काळी जात्यावर ओवी, गाणी म्हणण्याची पद्धत होती. बायका सकाळी लवकर उठून जात्यावर दळण दळताना आपल्या धन्याची, राजाची गाणी गात. याचा दाखला 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीमध्ये पाहावयास मिळतो :-

''पिलाजी गं परभू आला ऽ
साऱ्याचं गं भलं झालं !
सुखाचं गं दिस आलं मावळला
देवाचं गं राज आलं परजेला

राजा जनू मावळचा गं परजा सुखी खोऱ्यातली

तलवार त्याची गं खडी।

आई बहन निवांतली ॥

परिंड्याच्या कोटा मंदी

शाजी राजाच्या गं संग।

परभू पिला होता गं साथीला

......................''[१०४]

विश्वास ही एकमेव गोष्ट फक्त मराठी राजांजवळ अस्तित्वात होती. त्या विश्वासामुळेच बांदल राजांचं वतन शिवाजी राजांनी बाजींनाच परत दिलं होतं. राजाजवळ उत्तम घोड्यांची पागा असणे हे वैभवाचे लक्षण समजले जात असे. ज्यावेळी शिवाजी राजे बाजींना भेटण्यासाठी त्यांच्या गावी जातात. त्यावेळी बाजींकडे असलेली घोड्यांची पागा बघून ते बाजींना म्हणतात, ''यस्याश्वा तस्य राज्यं, यस्याश्वा तस्य मेदिनी।

यस्याश्वा तस्य सौख्यं, यस्याश्वा तस्य साम्राज्यम्।''

- ज्याच्या पदरी घोडा, त्याचं राज्य, त्याच ऐश्वर्य, त्याचं सुख, त्याचं साम्राज्य।[१०५]

बाजीप्रभूंची कुलदेवता वांगिणीची मळाईमाता हिच्या दर्शनासाठी बाजीप्रभूंच्या मातोश्री व वडील जातात. त्यावेळी तेथे अभिषेक केला जातो आणि कुमारिकांना जेवण दिले जाते. या सर्वांचे वर्णन 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत आले आहे.

पाहुण्यांचे स्वागत महत्त्वाचे समजले जाई. शकुन, अपशकुन, अंधश्रद्धा यावर विश्वास होता. त्याचप्रमाणे बारा बलुतेदारीची पद्धत समाजामध्ये अस्तित्वात होती. शिकार करण्याची आणि बैलांची झुंज खेळण्याची पद्धत करमणुकीसाठी समाजात रूढ होती. लाठी, बोथाटीचे खेळ, तलवारी, पट्ट्यांचे खेळ इत्यादींचा 'पावनखिंड' मध्ये उल्लेख आलेला आहे. त्याचप्रमाणे 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीमध्ये यात्रा व कुस्तीच्या फडाचे वर्णन

आले आहे. बाजींच्याकडे अनेक जातीची नामवंत घोडी होती. त्यामुळेच त्यांचे अश्वपरीक्षेचे ज्ञान चांगले होते. त्याचप्रमाणे दांडपट्ट्याच्या खेळाच्या उदाहरणाचा दाखला 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत आला आहे.

'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीमध्ये बाजींनी मावळातील डोंगराळ भागाचा अभ्यास केल्याचे दिसते. कोणते डोंगरकडे उंच असावेत, डोंगरांच्या घळी कशा आहेत, डोंगरावर किल्ले कसे असावेत, संरक्षणात्मक तटबंदी कशी असावी या सर्व गोष्टींचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला होता. किल्ल्यांची जडणघडण हा बाजींचा आवडीचा विषय होता. हे ओळखूनच राजांनी बाजींवर जासलोड गडाची बांधणी करण्याचे काम सोपविले होते.

''सिद्दी जौहरने पन्हाळगडाला ज्यावेळी वेढा दिला होता. त्यावेळी शिवाजी महाराजांची बाहेरील भिस्त नेताजीवर होती. पण नेताजीकडे सैन्याची कमतरता असल्याने सिद्दीचा वेढा उठविण्यात नेताजीला यश आले नाही. प्रतापराव गुजरने सिद्दीच्या सैन्यावर छापे घालून त्यास काही प्रमाणात हैराण केले होते. सिद्दीने यावेळी इंग्रजांची मदत मिळवली. इंग्रजांनी सिद्दीला वेढ्याच्या कामी उपयोगी पडणारे दारूगोळ्याचे सामान पुरविले. इंग्रज वखारीचा मुख्य हेन्री रिव्हिंग्टन, मिंघम, गिफर्ड व वेलजी असे राजपुराहून घाटाने १ तोफ व ५० गोळे एप्रिल १६६० मध्ये पन्हाळ्याजवळ आणण्यात आले.''[१०६]

मराठ्यांच्या राजवटीत किल्ल्यांना महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले होते. शिवरायांची राज्यकारभाराची मुख्य भिस्त ही किल्ल्यावरच अवलंबून होती. शिवाजीराजांनी दक्षिणेकडील या महत्त्वपूर्ण गडाचा ताबा इ.स. १६५९ मध्ये प्रथम मिळविला. पन्हाळगडावर मराठ्यांची सत्ता तीनशे वर्षे राहिली. इ.स. १६६० चा सिद्दी जौहरचा वेढा तर शिवशाहीतील महत्त्वाचा ऐतिहासिक प्रसंग होय.

दुसऱ्या कोणत्याही किल्ल्यापेक्षा पन्हाळा सहजासहजी जिंकायला अवघड होता. पन्हाळ्याच्या अवाढव्य पसाऱ्यामुळे सिद्दी जौहरला निर्णायक युद्ध करता येणार नाही,

त्याचा वेळ वाया जाईल, अन्नधान्य फस्त होईल, खर्च वाढेल अन् उद्या या सह्याद्रीतल्या प्रचंड पावसाच्या माऱ्यात वेढा ढिला पडेल. हा सर्व विचार करूनच शिवाजीराजे पन्हाळगडावर जातात.

जावळी तालुक्यात असलेला 'प्रतापगड' हा किल्लादेखील शिवकाळात अत्यंत महत्त्वाचा होता. चारी बाजूंनी घनदाट जंगल व दऱ्याखोऱ्यांनी वेढलेला हा किल्ला असल्याने शत्रूला तो जिंकून घेण्यास अवघड होता. समाजामध्ये फितुरी व घरभेदीपणा मोठ्या प्रमाणावर होता.

शिवकाळातील लोक अंगामध्ये अंगरखा, विजार, चोळणा, धोतर, डोक्यावर मुंडासे अशाप्रकारचा पोशाख परिधान करीत होते. तर स्त्रिया विविध प्रकारचे नक्षीकाम केलेल्या साड्या त्याचप्रमाणे सणसमारंभात शालू नेसत. त्याचप्रमाणे त्या काळी माणसामाणसात एकोपा होता. त्यांच्यात अगदी जवळीकतेचे संबंध होते. काही शकुन-अपशकुनदेखील पाळले जात होते. उदा. टिटवीचे ओरडणे अशुभ मानले जाई.

या गोष्टींप्रमाणेच स्वत:चा किंवा घरच्यांचा कसलाही विचार न करता देशासाठी, धन्यासाठी प्राणांची आहुती देणारे बाजी-फुलाजी, शिवा काशिद सारखे स्वामीनिष्ठ सरदारदेखील होते. एकंदरित 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत आलेले ऐतिहासिक आणि सामाजिक वातावरण अशा स्वरूपाचे होते.

'पावनखिंड' या कादंबरीमध्ये जे सामाजिक आणि ऐतिहासिक वातावरण आले आहे ते थोड्याफार प्रमाणात आहे. पण तरी देखील त्यावरून त्या काळच्या वातावरणाचे दर्शन घडते. परंतु 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीमध्ये प्रत्येक प्रसंगातून त्या काळच्या सामाजिक वातावरणाचे दर्शन होते. त्याचप्रमाणे अनेक प्रसंगांचे वर्णन अतिशय सखोलपणे केल्यामुळे तत्कालीन परिस्थिती आपल्या लक्षात येते. त्याचप्रमाणे ऐतिहासिक वातावरणामध्ये अनेक किल्ल्यांचे वर्णन येते. दोन्ही कादंबऱ्या ऐतिहासिक व सामाजिक वातावरण चित्रित करण्यात आपापल्या परीने यशस्वी झालेल्या आहेत.

## ५) संघर्ष चित्रण :-

व्यक्तिलेखनातील कणारूप असलेला एक महत्त्वाचा भाग म्हणजे संघर्ष. हा प्रसंग घटना-प्रसंगाद्वारा व्यक्त होत असतो. हा संघर्ष व्यक्ती-व्यक्तींमधला, व्यक्ती-समूहामधला, व्यक्तीच्या दोन मनामधील अशा स्वरूपाचा असू शकतो. हा संघर्ष दोन भिन्न-भिन्न प्रवृत्तींमधला भिन्न-भिन्न स्वभावांमधलाही असू शकतो. या संघर्षाचे स्वरूप ढोबळ किंवा सूक्ष्म असते. मनामनांचा, व्यक्ती-व्यक्तीमधला किंवा कोणताही संघर्ष जेवढे उग्र स्वरूप धारण करील तितका तो कलात्मक होईल. सूक्ष्मस्वरूपाचा संघर्ष व्यक्तिदर्शनाचे कलात्मक सौंदर्य वाढविणारा असतो.

'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्या संघर्षमय आहेत. शिवाजी महाराजांविरूद्ध मुसलमानी फौजेने पुकारलेला संघर्ष कादंबऱ्यांच्या पानापानातून दिसून येतो. राजांनी मांडलेला हिंदवी स्वराज्याचा डाव कसा उद्ध्वस्त करता येईल याचा विचार मुस्लिम राजे अफजलखान, फाजलखान, सिद्दी मसूद यांच्या रूपाने करीत होते. मराठेदेखील यामध्ये मागे नव्हते. बांदल-देशपांडे यांच्यात जे घनघोर युद्ध होते. त्यामध्ये बाजींचे आजोबा आणि थोरले बंधू कामी येतात. या युद्धाचे पडसाद साऱ्या जनतेवर पडतात. याचाच परिणाम म्हणून बाजींची बांदलाचे दिवाण म्हणून नेमणूक केली जाते. बांदल-देशमुखांचे प्रधान सेनापती असलेले बाजी अशाच एका संघर्षानंतर राजांना मिळतात हे 'पावनखिंड' कादंबरीमध्ये दिसून येते. स्वराज्य टिकवून ठेवण्यासाठी, रयतेवर होणारे अन्याय थांबविण्यासाठी राजे अफजलखानाबरोबर जो संघर्ष करतात त्याचा दाखला 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' कादंबरीत पाहावयास मिळतो.

जावळीचा चंद्रराव मोरे याचे रयतेवर अत्याचार दिवसेंदिवस वाढत जाताना राजे पाहतात. त्यामुळेच जावळी स्वराज्यात येण्यासाठी त्यांना आपल्याच माणसांशी संघर्ष करावा लागतो. सिद्दी जौहरसारख्या यमदूताशी राजांनी आगळ्या वेगळ्या पद्धतीने केलेला

संघर्षदेखील दोन्ही कादंबऱ्यांमध्ये आलेला आहे. ''पन्हाळा किल्ला मूळचा मजबूत असल्याने सिद्दी जौहरला तो सहजासहजी जिंकता येणे कठीण होते. तरीही किल्ल्यावर जमा केलेले धान्य आणि दारूगोळ्याची रसद ही तीन-चार महिन्यांपेक्षा अधिक काळ चालण्यासारखी नव्हती. अशा परिस्थितीत बाहेरून मदत मिळणे शक्य नव्हते. तसेच बाहेरची परिस्थिती नेताजीला थोपवून धरणे अशक्य बनले होते.

त्यामुळे शिवाजी महाराजांना वेढ्यातून बाहेर पडण्याशिवाय गत्यंतर नव्हते. यावेळी शिवाजीराजांनी तह करण्याची तयारी दर्शविली. तसेच किल्ला स्वाधीन करण्याचे बोलणे लावले व सिद्दीची भेटही घेतली होती. यावेळी राजांनी मुत्सद्देगिरीचा वापर करून शत्रूला गाफील ठेवले. १३ जुलै १६६० रोजी मध्यरात्री महाराज काही सैन्यासह पन्हाळगडाखाली उतरले व विशाळगडाकडे रवाना झाले. ही घटना सलाबतखानला थोड्यावेळाने समजली. त्याने महाराजांच्या पाठलागार्थ त्याचा जावई 'सिद्दी मसूद' व 'फाजलखान' यांची रवानगी केली. शिवाजी महाराजांनी बाजीप्रभूंसह काही सैन्य 'पांढरपाण्याजवळ' ठेवले. त्यांनी पांढरेपाणी येथे शत्रूला अडविले. 'पांढरेपाणी' हे आताचे भातताळी गाव. हा एक असा पट्टा होता की, जेथे शत्रूला पुढे जाण्याचा हा एकच मार्ग होता. सुरूवातीस विजापूरच्या पायदळाने बाजीप्रभू व त्यांच्या सैन्यावर दोनदा हल्ले केले. पण बाजीप्रभू त्याचा हल्ला परतवण्यात यशस्वी झाले. त्यानंतर फाजलखान व बाजीप्रभू यांच्या संघर्षात बाजीप्रभू मृत्यू पावले.''[१०७]

याठिकाणी देखील राजांना संघर्ष हा करावाच लागला. शिवा न्हाव्यासारखा एक साधा माणूस शिवाजी राजा बनून शत्रूच्या गोटात जातो. आपल्या देशासाठी, स्वामीसाठी प्राणाचे बलिदान देतो. त्याने या ठिकाणी केलेले अनमोल असे कार्य म्हणजे संघर्षच आहे. प्रत्यक्ष मराठे असलेले अनेक सरदार राजांविरूद्धच संघर्षाला उभे ठाकतात. सुर्वे-माळवणकरांसारखे सरदार 'खेळण्याला' सिद्दीच्या वतीने वेढा घालतात. यावरून राजांच्या

... SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR ... LIBRARY

जीवनात संघर्षाशिवाय काही नव्हतेच हेच या कादंबऱ्यांवरून लक्षात येते. म्हणून बैलांच्या झुंजीदेखील राजांना बघाव्या वाटत नाहीत. प्रत्यक्ष संघर्ष असा रणजित देसाईंनी चित्रित केला नाही. परंतु अरविंद दाढे यांनी संघर्षाचे केलेले जे वर्णन आहे. त्यामुळे त्यावेळेस घडलेला प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. प्रचंड कोसळणारा पाऊस, जळवा, विंचू व सापांनी भरलेली वाट, काटे-कुटे यांचे त्यांनी केलेले वर्णन वाचून सारा प्रसंग मन:पटलावर उमटतो. त्यामुळे आपल्या अंगावर शहारे येतात. दोन्ही कादंबरीमध्ये वर्णन केलेला शेवटचा संघर्ष मात्र कादंबऱ्यांचा शिरोबिंदू आहे. संघर्षाला सामोरे जाण्यासाठी प्रसंगी बाजी राजांना सुनावतात आणि स्वामीनिष्ठेपायी राजांना खेळण्याकडे जायला सांगून बाजी-फुलाजी खिंड लढवितात आणि देव, देश, धर्मासाठी आनंदाने मृत्यूला सामोरे जातात.

अशारीतीने 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबऱ्यांमध्ये संघर्षचित्रण आलेले आहे. त्याकाळी शिवाजीराजांना शेवटपर्यंत स्वराज्य टिकविण्यासाठी संघर्षाचा सामना करावा लागला हे यावरून समजते. या संघर्षासाठी त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी स्वामीनिष्ठा, राष्ट्रनिष्ठेपायी प्राणांची आहुती दिल्याचे लक्षात येते.

# संदर्भसूची

१) देसाई रणजित - पावनखिंड, मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रण मार्च २००७, पृ.क्र. २१.

२) तत्रैव, पृ.क्र. १४९.

३) तत्रैव, पृ.क्र. १५३.

४) तत्रैव, पृ.क्र. १५९.

५) तत्रैव, पृ.क्र. १६२.

६) दाढे अरविंद - महारूद्र बाजीप्रभू, अक्षयविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २२ जानेवारी २००७, पृ.क्र. १०३.

७) तत्रैव, पृ.क्र. १२२.

८) तत्रैव, पृ.क्र. २३०.

९) तत्रैव, पृ.क्र. २४२, २४३.

१०) तत्रैव, पृ.क्र. २५२.

११) तत्रैव, पृ.क्र. २८४.

१२) तत्रैव, पृ.क्र. २८६.

१३) देसाई रणजित - पावनखिंड, उनि, पृ. क्र. ८.

१४) तत्रैव, पृ.क्र. १४.

१५) तत्रैव, पृ.क्र. २९.

१६) तत्रैव, पृ.क्र. २१.

१७) तत्रैव, पृ.क्र. २१.

१८) तत्रैव, पृ.क्र. ५४.

१९) तत्रैव, पृ.क्र. ६७.

२०) तत्रैव, पृ.क्र. ७२.

२१) तत्रैव, पृ.क्र. ८९.

२२) तत्रैव, पृ.क्र. ९३.

२३) तत्रैव, पृ.क्र. ९५.

२४) तत्रैव, पृ.क्र. ११७.

२५) तत्रैव, पृ.क्र. १२६.

२६) तत्रैव, पृ.क्र. १२७, १२८.

२७) तत्रैव, पृ.क्र. १४०.

२८) तत्रैव, पृ.क्र. १४९, १५०.

२९) तत्रैव, पृ.क्र. १५३.

३०) तत्रैव, पृ.क्र. १५९.

३१) तत्रैव, पृ.क्र. १६०.

३२) तत्रैव, पृ.क्र. १६१.

३३) तत्रैव, पृ.क्र. १६२.

३४) दाढे अरविंद - महारूद्र बाजीप्रभू, उनि, पृ.क्र. २९.

३५) तत्रैव, पृ.क्र. ३३.

३६) तत्रैव, पृ.क्र. ७४.

३७) तत्रैव, पृ.क्र. ८५.

३८) तत्रैव, पृ.क्र. ९१.

३९) तत्रैव, पृ.क्र. ९२, ९३, ९४.

४०) तत्रैव, पृ.क्र. १०३.

४१) तत्रैव, पृ.क्र. १०५.

४२) तत्रैव, पृ.क्र. १२३.

४३) तत्रैव, पृ.क्र. १३४.

४४) तत्रैव, पृ.क्र. १३९, १४०.

४५) तत्रैव, पृ.क्र. १८६, १८७.

४६) तत्रैव, पृ.क्र. २११.

४७) तत्रैव, पृ.क्र. २२८.

४८) तत्रैव, पृ.क्र. २३०.

४९) तत्रैव, पृ.क्र. २३७.

५०) तत्रैव, पृ.क्र. २४२, २४३.

५१) तत्रैव, पृ.क्र. २५०.

५२) तत्रैव, पृ.क्र. २५२.

५३) तत्रैव, पृ.क्र. २५७.

५४) तत्रैव, पृ.क्र. २६०.

५५) तत्रैव, पृ.क्र. २७४.

५६) तत्रैव, पृ.क्र. २७६.

५७) तत्रैव, पृ.क्र. २८३.

५८) तत्रैव, पृ.क्र. २८६.

५९) Clayton Hamillon, “So you are writting aplay” - Page No. 208.

६०) देसाई रणजित - पावनखिंड, पृ.क्र. २०.

६१) तत्रैव, पृ.क्र. १२७, १२८.

६२) तत्रैव, पृ.क्र. १२९.

६३) तत्रैव, पृ.क्र. १४०.

६४) तत्रैव, पृ.क्र. १५३.

६५) तत्रैव, पृ.क्र. १५९.

६६) तत्रैव, पृ.क्र. १६१.

६७) तत्रैव, पृ.क्र. २१.

६८) तत्रैव, पृ.क्र. ५४.

६९) तत्रैव, पृ.क्र. ५७, ५८.

७०) प्रसाद - संस्थापक : कै. य.गो. जोशी, संपादक - श्री. मनोहर य. जोशी, वर्ष - ५७ वे अंक १२ वा, जुलै २००४, पृ.क्र. ३६, ३७.

७१) देसाई रणजित - पावनखिंड, उनि, पृ.क्र. १५३.

७२) तत्रैव, पृ.क्र. १६२.

७३) तत्रैव, पृ.क्र. १४०.

७४) तत्रैव, पृ.क्र. १४०.

७५) तत्रैव, पृ.क्र. १४९.

७६) तत्रैव, पृ.क्र. १५०.

७७) दाढे अरविंद - महारूद्र बाजीप्रभू, उनि, पृ.क्र. ११२.

७८) तत्रैव, पृ.क्र. २४२, २४३.

७९) तत्रैव, पृ.क्र. २४३, २४४.

८०) तत्रैव, पृ.क्र. २४९.

८१) तत्रैव, पृ.क्र. २५२.

८२) तरूण भारत - १ मे २००६ पृ.क्र. ३.

८३) दाढे अरविंद - महारूद्र बाजीप्रभू, उनि, पृ.क्र. ९१.

८४) तत्रैव, पृ.क्र. १०५.

८५) तत्रैव, पृ.क्र. १२३.

८६) तत्रैव, पृ.क्र. २३७.

८७) तत्रैव, पृ.क्र. २४२.

८८) तत्रैव, पृ.क्र. २५७.

८९) तत्रैव, पृ.क्र. २६०.

९०) तत्रैव, पृ.क्र. २८४.

९१) तत्रैव, पृ.क्र. २३०.

९२) तत्रैव, पृ.क्र. २३३.

९३) तत्रैव, पृ.क्र. २३७.

९४) तत्रैव, पृ.क्र. २५०.

९५) तत्रैव, पृ.क्र. २५०.

९६) तत्रैव, पृ.क्र. २५.

९७) तत्रैव, पृ.क्र. ९९.

९८) तत्रैव, पृ.क्र. २११.

९९) गोखले क. - शिवपुत्र संभाजी, पृ.क्र. १७, १८.

१००) गर्गे स.मा. करवीर रियासत, पृ.क्र. २-३.

१०१) मोडक बा.प्र. कोल्हापूर राज्याचा इतिहास पृ.क्र. २.

१०२) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड १ पृ.क्र. १९८.

१०३) देसाई रणजित - पावनखिंड, उनि, पृ.क्र. ५७, ५८.

१०४) दाढे अरविंद - महारूद्र बाजीप्रभू, उनि, पृ.क्र. ३८.

१०५) देसाई रणजित - पावनखिंड, उनि, पृ.क्र. २९.

१०६) कित्ता, पृ.क्र. २००.

१०७) कित्ता, पृ.क्र. २००, २०१.